


# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २१.१०.२०२६ | अंक नं. १७१ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020










# अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या बिनविरोध निवडीचा फुगा अखेर फुटला

## २१ पैकी १३ जागांवर होणार निवडणूक : विखे, राजळे, जगताप, ससाणेंसह आठ जण बिनविरोध : खा. लंके यांच्या उमेदवारीवरुन घमासान

नगर – बहुचर्चित जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याचे प्रयत्न अखेर फोल ठरले. पारनेरसह अकोले, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, नगर, राहुरी या सात सेवा सोसायटी मतदारसंघासोबतच जनरलच्या सहा जागांवर एकमत झाले नाही. त्यामुळे २१ पैकी १३ जागांवर निवडणूक लढली जाणार आहे. तर, सेवा सोसायटी मतदारसंघातील सात जागांसह बिगर शेती मतदारसंघातील एक अशा एकूण आठ जागा बिनविरोध झाल्या आहेत. त्यात संगमनेरम धून रणजीत देशमुख, नेवासेमधून शंकरराव गडाख, कोपरगावमधून आ.विवेक कोल्हे, शेवगावमधून राजश्री घुले, श्रीरामपूरमधून करण ससाणे, राहातामधून डॉ. सुजय विखे व पाथर्डीमधून आ. मोनिका राजळे हे सेवा सोसायटी मतदारसंघातील सात, व बिगर शेती मतदारसंघातून आ. संग्राम जगताप यांचे बंधू सचिन जगताप असे आठ जण बिनविरोध निवडून आले आहेत. मागील निवडणुकीत १७ जागा बिनविरोध झाल्या होत्या. त्या तुलनेत यावेळी निम्म्यापेक्षाही कमी जागा बिनविरोध झाल्या आहेत.

**बिनविरोध झालेल्या आठ जागा पुढीलप्रमाणे :**

१) रणजीत देशमुख – संगमनेर सेवा सोसायटी मतदारसंघ
२) शंकरराव गडाख – नेवासा सेवा सोसायटी मतदारसंघ
३) विवेक कोल्हे – कोपरगाव सेवा सोसायटी मतदारसंघ
४) राजश्री घुले – शेवगाव सेवा सोसायटी मतदारसंघ
५) करण ससाणे – श्रीरामपूर सेवा सोसायटी मतदारसंघ
६) सुजय विखे – राहाता सेवा सोसायटी मतदारसंघ
७) मोनिका राजळे – पाथर्डी सेवा सोसायटी मतदारसंघ
८) सचिन जगताप – बिगर शेती मतदारसंघ

खासदार नीलेश लंके पारनेर तालुका सेवा सोसायटी मतदारसंघातून माघार न घेण्याच्या मुद्यावर ठाम राहिल्याने निवडणूक अटळ ठरली. याठिकाणी विखे गटाकडून त्यांचे समर्थक राहुल शिंदे यांना उम `दवारी देण्यात आली असून लंके–शिंदे ही पारंपारिक लढत पुन्हा एकदा रंगणार आहे. तर नगर तालुका सेवा सोसायठी मतदारसंघातून आ. अक्षय कर्डिले यांच्याविरोधात माजी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष प्रताप शेळके हे रिंगणात उतरले आहेत. राहुरीमधुन आ.प्राजक्त तनपुरे यांच्याविरोधात देवळाली प्रवराचे नगराध्यक्ष सत्यजित कदम यांनी दंड थोपटले आहेत. अकोलेमधून आ.किरण लहामटे यांच्या विरोधात बँकेचे माजी अध्यक्ष सिताराम गायकर यांची कन्या संजीवनी शिंदे रिंगणात आहेत. तर अनुसुचित जमाती मतदार संघातून माजी आ.वैभव पिचड व माजी खा.सदाशिव लोखंडे यांचे सुपुत्र लोखंडे यांच्यातील लढत लक्षवेधी ठरणार आहे. उमेदवारांना निवडणुकीचे चिन्ह वाटप २२ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

जिल्हा बँकेच्या १४ सोसायटी मतदारसंघासह ७ सर्वसाधारण मतदारसंघातील जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू असताना पारनेरसह अकोले, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, नगर, राहुरी या सात ठिकाणी ठोस निर्णय झाला नाही. यासह जनरलच्या सहा जागांवर रस्सीखेच सुरु राहिल्याने जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध झाली नाही. जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी तब्बल २४० उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यात नेवासा व संगमनेर अर्ज छाननीत बिनविरोध झाले होते. उर्वरित १९ जागांसाठी २३९ उमेदवार राहिले होते. त्यातही सोमवारपर्यंत अवघ्या २२ जणांनी माघार घेतल्याने २१७ उमेदवार रिंगणात होते. आज अर्ज घेण्याच्या माघारीच्या शेवटच्या दिवशी अनेक उमेदवारांनी माघार घेतली.

(पुढील मजकूर व छायाचित्र पान ७ वर)




# अहिल्यानगर – पुणे महामार्गावर वाहनचालकांना लुटण्याचे सत्र पुन्हा सुरु

## चास घाटात किराणा व्यावसायिक तरुणाला दोघांनी मारहाण करून लुटले

नगर – अहिल्यानगर–पुणे महामार्गावर वाहनचालकांना रात्रीच्या वेळी अडवून लुटण्याचे गेल्या काही दिवसांपासून थांबलेले सत्र पुन्हा सुरु झाले आहे. चास घाटात लघुशंकेसाठी थांबलेल्या किराणा व्यावसायिक तरुणाला दोन अनोळखी इसमांनी अडवून लाकडी दांडक्याने मारहाण करत लुटल्याची घटना घडली आहे.

पवन अशोक गव्हाणे (वय २६, रा. गुंडेगाव, ता. नगर) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोन इसमांविरुध्द जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी पवन गव्हाणे यांचे सुपा (ता. पारनेर) येथे किराणा दुकान आहे. १८ ऑक्टोबर रोजी रात्री ८.२० च्या सुमारास त्यांनी नेहमीप्रमाणे आपले किराणा दुकान बंद केले व ते त्यांच्या मोटारसायकलवर नगरकडे येण्यास निघाले होते. रात्री ८.४५ च्या सुमारास ते चास घाट परिसरातून जात असताना आर्मीच्या फलकाजवळ लघुशंकेसाठी थांबले होते. त्यावेळी दोन अनोळखी इसम त्यांच्या दिशेने येताना दिसले. त्यांना पाहून गव्हाणे यांनी दुचाकी सुरू करून तेथून निघून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यातील एका इसमाने त्यांची दुचाकी ओढून खाली पाडली. त्यामुळे गव्हाणे हेही खाली पडले.

यानंतर दोघांनी त्यांना आणि त्यांची दुचाकी रस्त्यापासून काही अंतरावरील डोंगराच्या बाजूला नेले. तेथे त्यांनी गव्हाणे यांना, तू कुठला आहेस आणि तुझ्याकडे काय काय आहे, ते काढून दे, असे म्हणत धमकावले. त्यातील एकाने गव्हाणे यांना मारहाण केली. मारहाण करून धमकावल्यानंतर संशयित आरोपींनी गव्हाणे यांच्या खिशातील ४१ हजार ५०० रूपयांची रोख रक्कम, घड्याळ आणि चांदीचे ब्रेसलेट असा एकूण ५१ हजार ५०० रूपयांचा ऐवज बळजबरीने काढून घेतला. त्यानंतर त्यांना मोटारसायकलवर बसवून मागे न पाहता निघून जा असे धमकावले. त्यानंतर गव्हाणे यांनी तेथून जवळच असलेल्या एका हॉटेल मध्ये जावून डायल ११२ वर पोलिसांना फोन केला. काही वेळातच पोलीस तेथे आले. त्यांनी लुटारूंचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र तो पर्यंत ते पसार झाले होते. या प्रकरणी पवन गव्हाणे यांनी १९ ऑक्टोबर रोजी दिलेल्या फिर्यादी वरुन पोलिसांनी दोघा लुटारुंच्या विरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

### रात्रीच्या वेळी पोलीस गस्त वाढवा

नगर पुणे महामार्गावर चास, कामरगाव शिवार तसेच पुढे पवारवाडी घाट परिसरात वाहनचालकांना रात्रीच्या वेळी अडवून धारदार हत्यारांचा धाक दाखवत तसेच मारहाण करत लुटण्याच्या अनेक घटना काही दिवसांपूर्वी सातत्याने घडत होत्या. त्यावेळी नगर तालुका, सुपा पोलीस तसेच स्थानिक गुन्हे शाखेने काही टोळ्या पकडल्या होत्या. त्यामुळे गेल्या काही महिन्यांमध्ये अशा लुटीच्या घटना थांबल्या होत्या. मात्र ते सत्र पुन्हा सुरु झाल्याचे या घटनेवरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे पोलिसांनी रात्रीच्या वेळी महामार्गावर गस्त वाढवावी अशी मागणी होवू लागली आहे.

# नगर-पुणे महामार्गावर भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

नगर – नगर–पुणे महामार्गावर चास शिवारात भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला आहे. हा अपघात २० ऑक्टोबर रोजी रात्री ११.३० ते ११.४५ वाजण्याच्या सुमारास झाला आहे. रावसाहेब खंडू उमाप (वय ५०, रा. सिद्धार्थनगर, अहिल्यानगर) असे मयत दुचाकीस्वाराचे नाव आहे. मयत उमाप हे २० ऑक्टोबर रोजी रात्री आपल्या दुचाकीने नगर हून सुप्याकडे कामानिमित्त जात होते. चास शिवारात अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, उमाप यांच्या मृतदेहाचा पार चेंदामेंदा झाला होता. अपघातानंतर सदर वाहन चालक वाहनासह पसार झाला. तसेच या अपघातामुळे नगर पुणे महामार्गावरील वाहतूकही काहीवेळ ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच नगर तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविला. या प्रकरणी वाहनचालकावर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**पाहिजे**
दुकान कामासाठी मुलगा पाहिजे
9226622424









जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# ख्रिस्ती समाज दफनभूमीला संरक्षक भिंत, पथदिवे, स्वच्छता, पाणी व सीसीटीव्ही सुविधा देण्याची मागणी


ख्रिस्ती समाजाच्या दफनभूमीचा विकास करावा या मागणीचे निवेदन समाजाच्या वतीने आयुक्त यशवंत डांगे यांना देताना समाजाचे शिष्टमंडळ.

नगर - अहिल्यानगर शहरातील सिद्धार्थनगर येथील ख्रिस्ती समाजाच्या दफनभूमीची झालेली दुरवस्था दूर करून तिची तातडीने दुरुस्ती, सुशोभीकरण आणि मूलभूत सुविधांची उपलब्धता करून द्यावी, अशी मागणी समस्त ख्रिस्ती समाजाच्या वतीने महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

ख्रिस्ती दफनभूमीची संरक्षक भिंत अनेक ठिकाणी कोसळली असून, त्यामुळे मोकाट जनावरांचा दफनभूमीत प्रवेश होत आहे. परिणामी, कबरींचे नुकसान होत असून परिसराच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच महानगरपालिकेच्या वतीने बसविण्यात आलेले विद्युत दिवे अनेक वर्षांपासून बंद असल्याने रात्रीच्या वेळी अंत्यविधी आणि धार्मिक विधी पार पाडताना नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दफनभूमीच्या सर्वांगीण विकासासाठी कोसळलेल्या संरक्षक भिंतीची तातडीने दुरुस्ती करावी, बंद पडलेले पथदिवे सुरू करून पुरेशी प्रकाशव्यवस्था करावी, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध करून द्यावी, तसेच महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे उभारावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय दफनभूमीच्या प्रवेशद्वारासह आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, परिसरातील गवत व झाडाझुडपांची नियमित साफसफाई करावी आणि अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करून नागरिकांसाठी सुलभ ये-जा करण्याची व्यवस्था करावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

### पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याची मागणी

या दफनभूमीत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षिका मिस सिथिया फरार, नगरचे चर्च बांधणारे रेव्ह. ह्यूम, भास्कर पांडुरंग हिवाळे यांच्यासह इतर मान्यवरांच्या कबरी असल्याने या स्थळाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे दफनभूमीचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्याची मागणीही समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

दफनभूमीच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच महानगरपालिकेच्या माध्यमातून स्वतंत्र निधी मंजूर करून दुरुस्ती व सुशोभीकरणाची कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी आयुक्तांना करण्यात आली आहे.

यावेळी ह्युम चर्चचे रेव्ह सनी मिसाळ, सेक्रेटरी विलास साळवे, राजू देठे, लोकेश बर्वे,सुधाकर ठोंबरे, विशाल केदारी, रमेश भोसले, संजय मकासरे, बबन निकाळजे, राहुल बनकर, राजू अगस्ती, नितीन खंडागळे, दीपक साळवे अमोल काळे राजेश ओहोळ संदेश गुजराती, विक्टर पवार राजेश उजागरे सागर घोडके डॅनियल काळोखे सलोमन देठे किरण पवार नितीन पाटोळे आदीसह समस्त ख्रिश्चन समाजातील चर्चचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# टँकरच्या धडकेत गोरक्षकाचा मृत्यू

नगर - नगर-पुणे महामार्गावर केडगाव परिसरात कृष्णा वॉशिंग सेंटरसमोर टँकरचालकाच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या अपघातात दुचाकीवरील गोरक्षक युवकाचा मृत्यू झाला, तर त्याचा मित्र जखमी झाला. ही घटना १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास घडली. या प्रकरणी टँकरच्या अज्ञात चालकाविरूध्द १९ ऑक्टोबर रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सचिन संतोष पवार (वय २३, रा. कांबळे मळा, केडगाव) असे मयत युवकाचे नाव आहे. तर प्रतीक संतोष लिगडे (वय २१, रा. पाच गोडाऊन, दत्त मंदिराजवळ, केडगाव) असे जखमी युवकाचे नाव असून त्यांच्यावर खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत संतोष रामदास पवार (वय ४५, रा. कांबळेमळा, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. मयत सचिन पवार हा गोरक्षक म्हणून काम करत होता.

१४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी तो आणि त्यांचा मित्र प्रतीक लिगडे हे दोघे दुचाकीवरून नगर-पुणे रस्त्याने जात होते. ते कृष्णा वॉशिंग सेंटरसमोर आले असता, एका टँकरचालकाने (क्र.एमएच ०४ डीके ७५७८) रस्त्यावरील परिस्थितीकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे वाहन चालविल्याने त्यास दुचाकीची धडक बसून दोघेही जखमी झाले. टँकरचालकाच्या निष्काळजीपणामुळे या अपघातात सचिन पवार यांचा मृत्यू झाल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## मोटारसायकलची चोरी

नगर - बुऱ्हाणनगर येथील मिरावली बाबा पहाड रोडवरून होंडा शाईन मोटारसायकल (क्र. एम.एच. १६ सी.जे. ०४३७) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसात ते रात्री साडेबारा वाजण्याच्या दरम्यान घडली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रावसाहेब एकनाथ बारवेकर (वय ५३ वर्षे, धंदा- सुतारकाम, रा. सूर्यानगर, एस. टी. कॉलनी, भिंगार कॅम्प) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे बुऱ्हाणनगर येथे जयाकिशोरीजी यांच्या श्रीकृष्ण कथेसाठी गेले होते. त्यांनी त्यांची मोटारसायकल मिरावली बाबा पहाड रोडवर लावली होती. ती कोणतीही चोरून नेली. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




# ज्ञानेशकुमार यांच्या प्रतीकात्मक रावण प्रतीकृतीला जोडे मारो आंदोलन

नगर - मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या वतीने अहिल्यानगर शहरात सुरू असलेल्या साखळी उपोषणाच्या बाराव्या दिवशी विजयादशमीचे औचित्य साधून पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ज्ञानेशकुमार यांची प्रतीकात्मक रावण प्रतिकृती तयार करून तिला जोडे मारो आंदोलन केले. लोकशाहीतील मतदानाच्या पवित्र अधिकाराचे हरण केल्याचा आरोप करत आंदोलकांनी ज्ञानेशकुमार यांच्याविरोधात घोषणाबाजी केली करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर हे साखळी उपोषण सुरू आहे. विजयादशमीच्या पार्श्वभूमीवर आंदोलनकर्त्यांनी ज्ञानेशकुमार यांच्या कार्यपद्धतीचा निषेध करण्यासाठी प्रतीकात्मक रावणाची प्रतिकृती तयार केली. लोकशाहीत मतदारांचा मतदानाचा अधिकार सर्वोच्च असून, या अधिकाराचे संरक्षण करणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. यावेळी ज्ञानेशकुमार हे आजच्या युगातील रावण असल्याचा आरोपही करण्यात आला.

या आंदोलनात रिपाइंचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, प्रकाश थोरात, गुलाम शेख, अजीम खान, स्वप्नील साठे, लकी वाघमारे, अजीज शेख, अजय बडोदे, जमीर सय्यद, अरबाज शेख, जावेद सय्यद, आदिल शेख, योहान चाबुकस्वार, नईम शेख, ज्योती पवार, संपदा म्हस्के, मनीषा गायकवाड, रेश्मा जाधव सहभागी झाले होते.

### माजी उपनगराध्यक्ष, शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख

## अंबादास पंधाडे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - दिल्लीगेट येथील रहिवासी अहमदनगर नगरपालिकेचे



माजी उपनगराध्यक्ष, शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख अंबादास महादेवराव पंधाडे (अस्वर) (वय ७४) यांचे २० ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, पुतणे, पुतण्या, सुन, जावई असा परिवार आहे. सारंग पंधाडे यांचे ते वडील होत.

## रामकृष्ण आठरे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - जिल्हा परिषद शाळेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक



रामकृष्ण बाबुराव आठरे (वय ९०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. ते स्व. राजेश आठरे व प्रदीप आठरे यांचे वडिल तसेच राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या शहराध्यक्ष तथा शहर बँकेच्या संचलिका रेश्माताई आठरे यांचे सासरे तर 'गजराज'चे सुरेशराव चव्हाण यांचे ते व्याही होत.


आनंदतीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मास धर्म सभेत प्रविणऋषीजी महाराज यांनी दिशान किशोर गांधी याला व्यासपीठावर बोलावून कॉर्फबॉल खेळातील देदीप्यमान कामगिरीबद्दल त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली.

# शाकाहारी राहूनही यशोशिखरावर पोहोचता येते

### प्रविणऋषीजी महाराज यांचे प्रतिपादन, आनंदतीर्थ समवशरण येथे दिशान गांधी याचा गौरव

नगर - कोण म्हणतो की, शाकाहारी खेळाडू यशाच्या शिखरावर पोहचू शकत नाही? दिशान गांधी याने आपल्या जीवन मूल्यांशी कोणतीही तडजोड न करता प्रामाणिक राहून कॉर्फबॉल खेळात उत्तुंग भरारी घेतली आहे, असे आशीर्वादपर गौरवोद्गार उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज यांनी काढले.

आनंदधाम परिसरातील आनंदतीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मास धर्म सभेत प्रविणऋषीजी महाराज यांनी दिशान किशोर गांधी याला व्यासपीठावर बोलावून कॉर्फबॉल खेळातील देदीप्यमान कामगिरीबद्दल त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली.

प्रविणऋषीजी महाराज पुढे म्हणाले की, प्रत्येक आईवडिलांनी आपल्या मुलांना खेळासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळाचे स्थान खूप महत्त्वाचे असते. यावेळी दिशांचे आईवडील बबिता व किशोर गांधी आणि गांधी परिवाराचेही प्रविणऋषीजी महाराज यांनी विशेष कौतुक केले.

समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, पुण्याचे सुनील नहार, विलास राठोड, पद्मश्री पोपटराव पवार, अनिल पोखरणा, विलास कटारिया आदींच्या उपस्थितीत दिशानचा सत्कार करण्यात आला.

कृतज्ञता व्यक्त करताना दिशान गांधी म्हणाले की, आपल्या मुलांच्या विविध खेळांच्या कौशल्य वृद्धीसाठी, सहकार्यासाठी आम्ही तयार आहोत. समाजातील मोठे उद्योजक, व्यावसायिकांनी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, सुसज्ज मैदानांसाठी तयारी दर्शविली तर आम्ही क्रीडा मार्गदर्शन व आवश्यक सहकार्य करण्यास तत्पर असू.

# ज्ञानेशकुमार यांच्या प्रतीकात्मक रावणाचे हुतात्मा स्मारक येथे दहन




नगर - भारतीय लोकशाहीत मतदारांचे सार्वभौमत्व, मतदानाचा अधिकार आणि संविधानिक मूल्यांचे संरक्षण झाले पाहिजे, अशी भूमिका मांडत पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने विजयादशमीच्या निमित्ताने अहिल्यानगर शहरातील हुतात्मा स्मारक येथे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या प्रतीकात्मक रावणाचे दहन करुन त्यांना नरकांजली वाहण्यात आली. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करत संघटनांनी या उपक्रमातून निषेध नोंदविला. ज्ञानेशकुमार यांनी राजीनामा द्यावा, तसेच मतदारयादी पुनरीक्षण प्रक्रियेतील कथित अनियमिततांची स्वतंत्र चौकशी करावी, अशा मागण्या संघटनांकडून करण्यात आल्या.

विजयादशमी हा अनिष्ट प्रवृत्तींवर विजय मिळविण्याचा संदेश देणारा सण आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, मतदारांच्या अधिकारांचे संरक्षण आणि घटनात्मक संस्थांचे उत्तरदायित्व या मुद्द्यांकडे लक्ष वेधण्यासाठी प्रतीकात्मक रावणदहनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे संघटनांनी स्पष्ट केले. निवडणूक आयोगाने लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती, संविधाननिष्ठ नैतिकता आणि कायद्याचे राज्य या मूल्यांना प्राधान्य द्यावे, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. यावेळी कारभारी गवळी, अशोक सब्बन, वीर बहादूर प्रजापती, बबलू खोसला, शाहीर कान्हू सुंबे, आनंद आढाव, राहुल आढाव आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## राजेंद्र गुंदेचा यांचे अल्प आजाराने निधन

नगर - मधुरगण अपार्टमेंट, सारसनगर येथील रहिवासी



राजेंद्र बन्सीलाल गुंदेचा (ढोरजावाला) (वय ५८) यांचे २० ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, १ भाऊ, भावजय, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. मनोज गुंदेचा यांचे बंधू, श्रद्धा, साहील यांचे वडील, अर्चना गुंदेचा यांचे ते पती होत.

## भिंगारचे पैलवान सदाशिव भंडारी यांचे निधन



नगर - कुंभारगल्ली, भिंगार येथील पैलवान सदाशिव तुकाराम भंडारी (वय ९८) यांचे २० ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. जुन्या काळातील प्रसिध्द मल्ल असल्याने ते सर्वांना परिचित होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, ६ मुली, जावाई, ३४ नातू, पणतू असा परिवार आहे. ते कै. प्रभाकर भंडारी, राजेंद्र भंडारी, ईश्वर भंडारी व संजय भंडारी यांचे वडिल होत.

## महादेव ठोंबरे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी महादेव यशवंत



ठोंबरे (वय ८०) यांचे २० ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. जिल्हा परिषद आदर्श शिक्षक बाळासाहेब महादेव ठोंबरे यांचे ते वडील होत.

## हौसाबाई शेटे पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - सोनई येथील रहिवासी हौसाबाई शिवराम शेटे



पाटील (वय ९५) यांचे २१ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोनई अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, २ बहिणी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सेवानिवृत्त स्लीप मास्तर भाऊसाहेब शेटे पाटील यांच्या मातोश्री तर पत्रकार बाळासाहेब शेटे यांच्या त्या चुलती होत.

# तरूणाचा खून करून मृतदेह मुळा बॅकवॉटर कालव्यात फेकला

### शिंगवे नाईक येथील घटना, दोघा सख्या भावांवर खुनाचा गुन्हा दाखल

नगर - एका तरूणाचा खून करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याचा मृतदेह मुळा धरणाच्या बॅकवॉटर कालव्यात फेकून दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. गणेश मच्छिंद्र गायकवाड (वय ३२, रा.कमालपूर, ता. श्रीरामपूर) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी शिंगवेनाईक येथील दोघांवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले आहे.

गणेशचा मृतदेह २० ऑक्टोबर रोजी दुपारी वांबोरी जवळील कुक्कडओढा (ता. राहुरी) गावाच्या शिवारात आढळून आला होता. एमआयडीसी पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन जिल्हा शासकीय रूग्णालयात शवविच्छेदन केले. याप्रकरणी मयत गणेश यांचा भाऊ प्रदीप मच्छिंद्र गायकवाड (वय ३४, हल्ली रा. विहा मांडवा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, मुळ रा. कमालपूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार योगेश राजेंद्र जाधव आणि महेश राजेंद्र जाधव (दोघे रा. शिंगवे नाईक, ता. अहिल्यानगर) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. फिर्यादीनुसार, त्यांचा लहान भाऊ गणेश याने हॉटेल मॅनेजमेंटचे शिक्षण घेतले होते. तो पुणे येथे नोकरी करून राहत होता. त्याला दारू पिण्याचे व्यसन होते.

दारू प्यायल्यानंतर तो कुटुंबीयांशी वाद घालत असे. गणेश याचे एका महिलेसोबत लग्नापूर्वी अनैतिक संबंध होते. १७ ऑक्टोबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास एका अनोळखी क्रमांकावरून फिर्यादी प्रदीप यांना फोन आला. गणेश दारू पिऊन शिंगवे नाईक येथील एका घरात शिरत असताना आढळल्याचे आणि त्याला पकडून ठेवल्याचे फोन करणाऱ्याने सांगितले.

दरम्यान, प्रदीप यांनी शिंगवे नाईक गावातील नागरिकांकडे चौकशी केली असता, गणेश घरात शिरताना आढळल्याने योगेश जाधव व महेश जाधव यांनी त्याला मारहाण करून ठार मारले आणि पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह मुळा धरणाच्या बॅकवॉटर कालव्यात टाकल्याची माहिती मिळाल्याचे प्रदीप यांनी फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी योगेश जाधव व महेश जाधव यांच्या विरुद्ध बीएनएस कलम १०३ (१), २३८, ३(५) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# नगर-पुणे महामार्गावर कार पलटी; तरुणीचा मृत्यू

नगर -नगर-पुणे महामार्गावर कामरगाव शिवारामध्ये हॉटेल सुवर्णज्योतजवळ भरधाव वेगातील कार वरील चालकाचा ताबा सुटल्याने ती दुभाजकाला धडकून झालेल्या भीषण अपघातात एक २८ वर्षीय तरुणी जागीच ठार झाल्याची घटना घडली आहे. शिल्पा सोमनाथ वेडे (वय २८, रा. मु.पो. कोहोणे, अहिल्यानगर) असे मृत पावलेल्या तरुणीचे नाव आहे.

सदर मयत तरुणी ही कामानिमित्त पुणे जिल्ह्यातील रांजणगाव (ता.शिरूर) येथे एकटीच राहत होती. १७ ऑक्टोबर रोजी रात्री शिल्पा आणि तिचा ओळखीचा तरुण कमलेश शरद राऊत (रा. धामणगाव पाट, ता. अकोले) हे दोघे टाटा पंच कारने (क्र. एम.एच. १४ के.बी. २६९४) देवदर्शनासाठी जात होते. ते रात्री ११ वाजण्याच्या सुमारास कामरगाव शिवारातील हॉटेल सुवर्णज्योतजवळ आले असता चालक कमलेश राऊत याने आपले वाहन अतिशय भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवले.

त्यामुळे त्याचे कारवरील नियंत्रण सुटून कार दुभाजकाला धडकून पलटी झाली. या भीषण अपघातात कारमधील शिल्पा वेडे हिच्या डोक्यास व शरीराला गंभीर दुखापत होऊन उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी मृत तरुणीची बहीण संजीवनी शिवराम रेंगडे यांनी१९ ऑक्टोबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात चालक कमलेश शरद राऊत याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### ऑफिसमधील धावपळीत तंदुरुस्त राहण्याचे सोपे मार्ग

जेवण न झाल्यान आणि कामाचा ताण यामुळे अनेकदा आपण सहज उपलब्ध होणारे जंक फूड किंवा मैद्याचे पदार्थ खाण्याकडे वळतो. यामुळे आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. कामाच्या ठिकाणी जंक फूड टाळून निरोगी राहण्यासाठी काही सोप्या आणि प्रभावी गोष्टी आपण अंगीकारू शकतो. सकाळची सुरुवात योग्य आणि पौष्टिक नाश्त्याने करणे अत्यंत गरजेचे असते. अनेकदा लोक घाईत नाश्ता टाळतात किंवा चहा-बिस्किटांवर भागवतात, ज्यामुळे दुपारी अतिभूक लागते आणि समोर आलेले कोणतेही तेलकट किंवा जंक फूड खाल्ले जाते. त्याऐवजी मोड आलेली कडधान्ये, ओटस्, फळे किंवा पौष्टिक पराठे यांचा आहारात समावेश केल्यास शरीराला ऊर्जा मिळते आणि ताजेतवाने वाटते. ऑफिसमध्ये सोबत खाण्यासाठी नेहमी ड्रायफ्रूट्स बाळगणे फायदेशीर ठरते. जेव्हा कधी मधल्या वेळेत भूक लागेल, मूठभर बदाम, अक्रोड किंवा काजू खाल्ल्याने आरोग्याला पोषण मिळते आणि वजनही नियंत्रित राहते. कामाच्या व्यस्ततेमध्ये पाण्याचे प्रमाण कमी होणे ही एक सामान्य समस्या आहे. जेवणाच्या बाबतीत फास्ट फूड मागवण्याऐवजी घरचा डबा आणणे हा सर्वोत्तम उपाय आहे. डब्यात हिरव्या पालेभाज्या, डाळ, चपाती आणि कोशिंबीर असा समतोल आहार असावा, ज्यामुळे शरीराला सर्व आवश्यक जीवनसत्त्वे मिळतात. तसेच खाताना मोबाईल किंवा लॅपटॉपमध्ये लक्ष न ठेवता अन्नावर लक्ष केंद्रित करून हळूहळू आणि नीट चघळून खाल्ले पाहिजे, ज्यामुळे पचनक्रिया उत्तम राहते. अशा प्रकारच्या आरोग्यदायी सवयी लावून घ्याव्यात.

## पाककला

### रव्याचा मिनी केक

**साहित्य :** रवा, एक कप ओले खोबरे अर्धी वाटी किसलेले, तूप दोन मोठे चमचे, दूध अर्धा कप, वेलची पूड अर्धा छोटा चमचा, बेकिंग पावडर अर्धा छोटा चमचा, साखर मिश्रणासाठी अर्धी वाटी, साखर पाकासाठी एक कप, पाणी, पाकासाठी एक कप लिंबाचा रस, अर्ध्या लिंबाचा तुकडा सुका मेवा काजू आणि बदामाचे काप आवडीनुसार

**कृती :** एका भांड्यात एक कप साखर आणि एक कप पाणी एकत्र करून गॅसवर उकळायला ठेवा. साखर विरघळल्यानंतर पाक थोडा चिकट होईपर्यंत उकळा. पाकावर मळ साचल्यास लिंबाचा रस घाला म्हणजे पाक स्वच्छ होईल. पाकात वेलची पूड घालून गॅस बंद करा. एका मोठ्या भांड्यात रवा किसलेले ओले खोबरे अर्धी वाटी साखर आणि तूप चांगले एकत्र करा. या मिश्रणात दूध हळूहळू घालून मऊसर भिजवून घ्या आणि दहा ते पंधरा मिनिटे झाकून बाजूला ठेवा जेणेकरून रवा फुलेल. त्यानंतर त्यात बेकिंग पावडर घालून मिश्रण पुन्हा एकदा नीट हलवून घ्या. एका लहान पसरट भांड्याला किंवा वाटीला थोडे तूप लावून घ्या. त्यात तयार केलेले मिश्रण ओता आणि वरून काजू बदामाचे काप घाला. हे भांडे कुकरमध्ये शिट्टी काढून किंवा इडली पात्रात वीस ते पंचवीस मिनिटे मंद आचेवर वाफवून घ्या. केक तयार झाल्यावर तो थंड होऊ द्या. त्यानंतर त्याचे छोटे तुकडे कापून कोमट साखरेच्या पाकात पाच ते दहा मिनिटे भिजत ठेवा जेणेकरून पाक आतपर्यंत जाईल.

## वास्तू

### पाण्याचे स्त्रोत

* घरातील पिण्याच्या पाण्याचा माठ, हंडा किंवा पाण्याचा स्रोत नेहमी ईशान्य (उत्तर-पूर्व) दिशेला ठेवावा. यामुळे घरात धन आणि संपत्तीची सतत आवक राहते.

* पाण्याचा स्रोत आणि चुलीची जागा कधीही एकत्र किंवा समोरासमोर नसावी. पाणी आणि अग्नी यांच्यात योग्य अंतर असावे.

* खिडक्यांची आणि दरवाजांची संख्या नेहमी सम असावी (उदा. २, ४, ६, ८)

## सौंदर्य

सकाळी गार पाण्याने तोंड धुतल्याने त्वचेची छिद्रे बंद होतात आणि त्वचा ताजीतवानी दिसते. ही अगदी सोपी पद्धत असून यासाठी कोणत्याही रासायनिक उत्पादनाची गरज भासत नाही.

## सल्ला

गरम मसाला फोडणीत न घालता भाजी पूर्ण शिजल्यावर वरून घालून झाकण ठेवावे. यामुळे मसाल्याचा सुवास आणि चव टिकून राहते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६

**पाशांकुशा एकादशी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, शततारा २०|४९, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** नवीन जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पडतील.

**वृषभ :** आर्थिक लाभाचे योग असून जुने वाद संपुष्टात येतील.

**मिथुन :** बौद्धिक कामांमध्ये यश मिळेल आणि प्रवासाचे योग जुळून येतील.

**कर्क :** कौटुंबिक वातावरण आनंदी राहील, महत्त्वाच्या इच्छा पूर्ण होतील.

**सिंह :** मान-सन्मानात वाढ होईल आणि व्यवसायात मोठी भरभराट होईल.

**कन्या :** कामाचे योग्य नियोजन केल्याने अपेक्षेप्रमाणे यश मिळणे सोपे जाईल.

**तुळ :** भागीदारीच्या कामातून आर्थिक लाभ होईल.

**वृश्चिक :** कामाच्या ठिकाणी वाद होतील.

**धनु :** भाग्य पूर्णपणे साथ देईल आणि अडकलेली कामे सुरळीत मार्गी लागतील.

**मकर :** मेहनतीचे फळ उत्तम प्रकारे मिळेल आणि वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**कुंभ :** मित्रपरिवाराची उत्तम साथ, नवीन उत्पन्नाचे स्रोत निर्माण होतील.

**मीन :** कुटुंबासोबत आनंदाचे क्षण घालवण्याची संधी मिळेल. मागील उधारी वसुल होईल.

## शब्दगंध क्र. ७५४१ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) योग्य; उत्तम प्रतीचे ३) प्रणाम; वंदना; नमन ६) कमी प्रतीचे ; हलक्या दर्जाचे ७) पाणी; जीवन; नीर ८) कोलकात्याचे आंतरराष्ट्रीय विमानतळ (पूर्वीचे नाव) ११) विश्राम; विराम; विश्रांती; विसावा १२) जीवन; पाणी; जल १३) गावाचे प्रवेशद्वार १४) पहाट; प्रभात १६) एक द्रवरूप धातू १७) एक अंबटगोड फळ २०) सोने; कनक; सुवर्ण २२) फणसाची एक जात २३) ओझे वाहणारा पूर्वीचा एक गाव कामगार २४) गुणदोषांचे विवेचन करणारा; समीक्षण करणारा

**उभे शब्द :-** १) पत्थर; धोंडा २) मुस्लीम पुरुषाचे एक नाव ४) लाजाळू; शरमणारा ५) ओकारी येईल अशी शरीराची स्थिती ९) इच्छा; आकांक्षा; कामना १०) भय; भीती ११) आजूबाजूला; परिसरात १४) पार्वतीपती; शंकर; महादेव १५) सुंदर; रम्य; सुबक १७) अग्नी १८) बसक्या नाकाची १९) डोंगर वगैरेतील खोलगट जागा किंवा घळ २१) ओरखाडा; रेषा २२) वडिलांचा भाऊ; चुलता

### शब्दगंध क्र. ७५४० चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** बोलण्यापेक्षा आपले काम इतके मोठे असावे की शब्द कमी पडतील पण यश बोलेल.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### माणसाचे डोळे जन्मापासून मृत्यूपर्यंत एकाच आकाराचे राहतात, पण नाक आणि कान सतत का वाढत राहतात?

माणसाचे शरीर हे निसर्गाचा एक अत्यंत विस्मयकारक चमत्कार आहे. आपल्या शरीराची रचना वेगवेगळ्या अंगांनी कशी झाली आहे, याविषयी अनेक कुतूहल निर्माण करणारे प्रश्न आपल्या मनात सतत घोळत असतात. असाच एक अत्यंत रंजक आणि वारंवार विचारला जाणारा प्रश्न म्हणजे माणसाचे डोळे जन्मापासून मृत्यूपर्यंत एकाच आकारात राहतात, मात्र त्याचे कान आणि नाक आयुष्यभर सतत कसे वाढत राहतात?

या प्रश्नाचा वैज्ञानिक आणि शारीरिक मागोवा घेतल्यास आपल्याला अनेक रंजक गोष्टी समजतात. अनेकांना असा गैरसमज असतो की आपले कान आणि नाक खरोखरच आयुष्यभर सतत मोठे होत राहतात, परंतु यामागे शरीराची एक खास अंतर्गत रचना आणि निसर्गाचे भौतिक नियम दडलेले आहेत.

सर्वप्रथम डोळ्यांच्या बाबतीत बोलायचे झाल्यास, लहान मूल जन्माला येते तेव्हा त्याचे डोळे आणि प्रौढ माणसाचे डोळे यांच्या आकारात फारसा मोठा फरक नसतो. बालपणी डोळ्यांचा आकार पूर्णपणे विकसित झालेला असतो आणि तो आयुष्यभर जवळपास स्थिर राहतो. म्हणूनच लहान मुलांचे डोळे खूप मोठे आणि देखणे दिसतात.

परंतु, नाक आणि कानांच्या बाबतीत पूर्णपणे वेगळीच प्रक्रिया घडते. आपले नाक आणि कान हे हाडांचे बनलेले नसतात, तर ते एका अत्यंत लवचिक आणि मऊ ऊतीचे बनलेले असतात. या लवचिक ऊतीला विशिष्ट प्रकारचा आकार आणि बळकटी असते. माणसाची वाढ थांबल्यानंतरही या लवचिक ऊतींची वाढ अतिशय संथ गतीने आयुष्यभर सुरूच राहते.

याशिवाय, वयानुसार गुरुत्वाकर्षण शक्तीचा आपल्या शरीरावर सातत्याने प्रभाव पडत असतो. जसजसे माणूस वयाची पन्नाशी किंवा साठी ओलांडतो, तसतसे या लवचिक ऊतींमधील लवचिकता कमी होत जाते आणि त्या सैल पडू लागतात. गुरुत्वाकर्षणामुळे हे सैल झालेले भाग खाली लटकू लागतात आणि त्यामुळे कान आणि नाकाचा आकार वाढल्यासारखा किंवा मोठा झाल्यासारखा भास होतो. प्रत्यक्षात त्यांची वाढ थांबलेली असते, पण त्वचेचा सैलपणा आणि गुरुत्वाकर्षण यांच्या संयुक्त परिणामांमुळे ते लांब आणि मोठे दिसू लागतात.

थोडक्यात सांगायचे तर, डोळे हे शरीराच्या अंतर्गत रचनेनुसार ठराविक वयानंतर वाढणे पूर्णपणे थांबवतात, तर कान आणि नाक हे लवचिक ऊतींचे बनलेले असल्यामुळे आणि गुरुत्वाकर्षण तथा वयानुसार होणाऱ्या बदलांमुळे आयुष्यभर मोठे होत असल्याचा भास निर्माण करतात. निसर्गाची ही रचना माणसाच्या शरीराला वयानुसार येणाऱ्या बदलांचे एक सुंदर उदाहरण दाखवून देते.

## खुर्चीची किंमत

एका मोठ्या शहरात एक प्रसिद्ध आणि श्रीमंत उद्योगपती राहत होते. त्यांच्या भव्य कार्यालयात एक अतिशय देखणी, मूल्यवान आणि मखमली खुर्ची होती. ती केवळ बसण्यासाठी नव्हती, तर ती त्यांच्या 'सत्ता आणि अधिकाराचे' प्रतीक होती.

ते उद्योगपती त्या खुर्चीवर बसून मोठे निर्णय घ्यायचे, लोकांना आदेश द्यायचे आणि सर्वांना वाटायचे की ही खुर्चीच त्यांना सामर्थ्य देते. उद्योगपतींनाही हळूहळू त्या खुर्चीचा खूप अहंकार झाला. त्यांना वाटू लागले की, मी या खुर्चीवर बसतो म्हणूनच लोक माझा आदर करतात.

एक दिवस, त्या कार्यालयात एक वृद्ध सुतार खुर्चीची किरकोळ दुरुस्ती करण्यासाठी आला. काम करताना चुकून त्याचा हात खुर्चीला लागला आणि त्यावरील थोडेसे मखमल फाटले. उद्योगपती प्रचंड रागावले आणि म्हणाले, तुझी हिम्मत कशी झाली माझ्या या मूल्यवान खुर्चीला खराब करण्याची? ही साधी खुर्ची नाही, ही माझ्या पदाची आणि मानसन्मानाची जागा आहे!

वृद्ध सुताराने नम्रपणे उत्तर दिले, साहेब, रागवू नका. मी ही खुर्ची दुरुस्त करून देईन. पण एक गोष्ट लक्षात ठेवा- खुर्ची माणसाला मोठी बनवत नाही, तर माणसाचे विचार आणि कर्म त्या खुर्चीला मान मिळवून देतात. जर या खुर्चीवर उद्या एखादी अयोग्य व्यक्ती बसली, तर लोक या खुर्चीचाही आदर करणार नाहीत. खुर्चीचे महत्त्व ती बनवलेल्या लाकडावर किंवा कपड्यावर नसून, तिच्यावर बसणाऱ्या व्यक्तीच्या योग्यतेवर असते.

उद्योगपतींना सुताराच्या शब्दांचा खोल अर्थ समजला. त्यांना जाणीव झाली की, ते खुर्चीचा आणि आपल्या पदाचा व्यर्थ अहंकार करत होते. पद आणि खुर्ची ही तात्पुरती असतात; खरी ओळख माणसाच्या नम्रतेने आणि चांगल्या कर्मानेच निर्माण होते.

बोध : खुर्ची किंवा पदामुळे माणसाला आदर मिळत नाही, तर माणसाच्या गुणांमुळे आणि चांगल्या वागणुकीमुळे त्या पदाला शोभा येते. पद आज आहे, उद्या जाईल; पण तुमचे चांगले विचार आणि कर्म नेहमी लोकांच्या लक्षात राहतात.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

त्याला शिवनेत्र किंवा म्हटले जाते. त्याला दहावे द्वार, सहावे चक्र, आज्ञा चक्र, दशम द्वार, तिसरा डोळा असे आणि सुध्दा म्हटले जाते. ह्यावर ध्यान केंद्रीत केल्याने आम्ही आत्मपथावर चालू शकतो. अध्यात्मिक मंडळाचे हे प्रवेश द्वार होय. अंतरीय मंडळ कोठे आहेत?जेव्हा आम्ही आमचे संपूर्ण ध्यान शिवनेत्रावर अथवा वर केंद्रित करतो. तेव्हा आम्हाला अध्यात्मिक मंडळे पहावयास मिळतात.

ही मंडळे बाह्य विश्वातील मंडळांबरोबरच विद्यमान असतात. अधिक चांगल्या शब्दावली अभावी आम्ही ह्यांचा अंतरीय आणि बाह्य अथवा वरिष्ठ आणि कनिष्ठ मंडळे असा उल्लेख करतो.

ही चैतन्यमय मंडळे आहेत. काळ आणि अवकाश (दिक्काल) ह्यांच्या सीमा कक्षेबाहेर असतात. फक्त बाह्यस्थ भौतिक मंडळे काळ आणि आकाशाच्या मोजमापाने मोजली जातात. भौतिक मंडळे ज्यात पृथ्वी, सूर्य, अन्य ग्रह आणि आकाशगंगा आहेत, ही अध्यात्मिक मंडळांबरोबरच विद्यमान असतात. आम्ही काळ आणि अवकाश ह्यांच्या मोजमापाबद्दल बोलतो तेव्हा ह्या जगातील मोजम ापांचा उल्लेख करतो.

परंतु ही सर्व भौतिक मंडळापासून ते अध्यात्मिक मंडळापर्यंतची मंडळे चेतनेच्या वेगवेगळ्या अवस्थेत असतात. जेव्हा आम्ही अंतरीय वा वरिष्ठ मंडळात जाण्याची गोष्ट करतो तेव्हा आम्ही तेथे चालत जाण्याबद्दल बोलत नाहीत तर आमचे ध्यान दुसऱ्या ठिकाणी म्हणजे चेतनतेच्या सर्वोच्च अवस्थेकडे करण्याची गोष्ट बोलत असतो.

एक उदाहरण डोळ्यांपुढे आणू या! जेव्हा आम्ही बातम्या वा गप्पागोष्टी करीत असतो तेव्हा अचानक आम्हाला पूर्वी आमच्या बाबत घडलेल्या गोष्टींची आठवण होते आणि दुसऱ्या ठिकाणी अन्यवेळी घडलेले ते दृश्य आमच्या डोळ्यांपुढे जसेच्या तसे उभे रहाते. अशावेळी आम्ही कोठेही गेलेलो नसतो तर आमचे मन अन्यत्र ध्यान केंद्रीत करीत असते.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

शिवानीदीदी : आपल्या विचारांत आणि शब्दांत साम्य नसेल तर आपल्या ऊर्जेमध्ये सुसंगती नसेल. भलेही आपल्याला एखाद्यामध्ये बदल घडवायचा असेल, त्याला उद्धटपणे न बोलता सत्य सांगायचं असेल - तर मग ते आपल्याला चांगल्या पद्धतीने सांगावं लागेल. आपली प्रतिक्रिया देताना, हे माझ्या मते आहे असा स्पष्ट उल्लेख करणं खूप महत्त्वाचं आहे.समजा, तुम्ही रात्रीच्या भोजन समारंभाला पांढरा ड्रेस घालून गेला. कोणीतरी आलं आणि तुम्हाला म्हणालं, माझ्या मते रात्रीच्या भोजन समारंभाला पांढऱ्या आतून बाहेरच्या दिशेने रूपांतरणरंगाचे कपडे घालू नयेत, काळ्या रंगाचे अधिक शोभतात. ही त्यांची निवड आहे. आता चेंडू तुमच्याकडे आहे. त्यामुळे, रात्रीच्या भोजनासाठी काळा रंग कदाचित शोभत असेलही पण मला पांढरा आवडतो, असं तुम्ही म्हणू शकता. असं बोलणं म्हणजे एकमेकांचा आदर करणं. अशा प्रकारे आपल्या आतही आणि बाहेरील्या इतरांशी संवाद साधतानाही आपल्या ऊर्जा सुसंगत राहतील.

स्वत:पासून सुरुवात करू या. आपण जो विचार करतो तेच बोलू या. जर एखादी गोष्ट बोलण्यालायक नसेल तर ती विचार करण्यालायकही नाही हे अधोरेखित करा. आपल्याला इतरांना दुखवायचं नाही म्हणून आपण काही बोललो नाही तर आपण त्याचा विचार करणंही टाळायला हवं. कारण आपल्या विचारांचे तरंग त्यांच्यापर्यंत पोहोचतात आणि तेच विचार आपल्यात नकारात्मक ऊर्जाही निर्माण करतात. आपल्याला एक विचार करण्याची आणि तो लपवण्यासाठी दुसरंच काही बोलण्याची सवय असेल तर आपल्या आत प्रचंड ढीग जमा होईल.

आणि मग एक दिवस अचानक अशी एखादी घटना घडेल ज्याने तुमच्या आतल्या कपाटाचे दरवाजे उघडतील.

तसं झालं तर आपल्याला अशा पद्धतीने बोलताना बघून इतरांना धक्का बसेल. कदाचित आपल्याच शब्दांवर आपला विश्वास बसणार नाही. म्हणूनच मनात सगळं साठवून ठेवल्याने आपल्यामध्ये आणि आपल्या नात्यांमध्ये विसंगती निर्माण होते. भलेही आपल्या आतल्या कपाटाचे दरवाजे बंद राहिले आणि इतरांना ते समजलं नाही तरी त्याची स्पंदनं त्यांच्यापर्यंत निश्चितच पोहोचतात.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पेशंट : डॉक्टर, दाताचा खूप त्रास होतोय, काहीतरी उपाय सांगा.
डॉक्टर : सोपं आहे, तो दातच काढून टाका! पेशंट : अरे बापरे!
डॉक्टर: अहो, दातच नसला की वेदना कसल्या होणार?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे मुख्य कार्यालय कुठे आहे?

— द हेग (नेदरलँडस्)

**— अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

त्याच प्रमाणे शिरोधारा, शिरोबस्ती, जानुबस्ती, मन्याबस्ती, नेत्रबस्ती, उत्तरबस्ती, गंडूष, कवल हे उपक्रम देशीय विशेष आजारांवर आयुर्वेदामध्ये सांगितलेले आहेत. संधिवात, अर्धांगवायू, स्थौल्य, मधुमेह, हृदयविकार, रक्तदाब, मूत्रक्षय, वंध्यत्व, सौंदर्य विकार, त्वचाविकार यामध्ये पंचकर्माने शरीरशुद्धी केली असता हे आजार बरे होतात. या प्रकरणात आपण पंचकर्माची माहिती थोडक्यात बघितली.स्त्री व पुरुष बीजदुष्टीसाठी त्रिदोषांना साम्यावस्थेत आणणारी औषधोपचार योजना सुरू करून विरेचन व बस्ती हे पंचकर्म उपचार तामडवादी ठरतात. पंचकर्मातील सर्वच उपक्रम करण्याचे जरुरी नसते. प्रकृतीनुसार पंचकर्म करून आहार, विहार, ध्यान धारणा, प्राणायाम, मंत्रोपचार उपयोगी ठरतात. अशा प्रकारे पंचकर्मातून शरीर व मन शुद्धी करून गर्भस्थापनेसाठी आवश्यक असलेली बीजशुद्धी होते.

शारीरस्थानज्या प्रमाणे चांगले पीक घेण्यासाठी योग्य ऋतू, मशागत केलेली काळी जमीन, त्या पिकाला पुरेसे पाणी व चांगले बीज या चारही गोष्टी आवश्यक असतात, त्या प्रमाणे सुदृढ, सुसंस्कारित, तेजस्वी बाळासाठी योग्य वेळ, निरोगी स्त्री शरीर व गर्भाशय, शुद्ध व सुसंस्कृत बीज यांची आवश्यकता असते. या चारही गोष्टींवर बाळाचे शारीरिक व मानसिक आरोग्य अवलंबून असते. हे अगदी प्राचीन काळात आपल्या संस्कृतीत उमग पावलेले महान अशा आयुर्वेदशास्त्रात नमूदलेले आहे. त्यामुळेच या शास्त्राचे महत्त्व उत्तर देशापरी सुद्धा पसरले आहे. या शास्त्राला सर्व जगामध्ये सन्मान मिळाला आहे.६. पंचकर्माद्वारे शरीर शुद्धीतून बीज शुद्धी व संसर्जन क्रम :बीज शुद्धीसाठी पंचकर्म हे गर्भधारणा होण्यापूर्वी करावे तर गर्भावस्थेमध्ये शरीरातील हार्मोन्सचे संतुलन राखण्यासाठी व नैसर्गिक सुखम प्रसूती होण्यासाठी सौम्य अवस्थेतील पंचकर्म चिकित्सा करता येते व त्यासोबत पंचकर्मातील उपकर्म व पूर्वकर्म ही करता येतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००





उत्सव थायलंड इंटरनॅशनल शॉपींग कार्निव्हल या नावाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील विविध उपयोगी वस्तुंचे प्रदर्शन नगर शहरात भरलेले आहे.

# नगरमध्ये २५ ऑक्टोबरपर्यंत उत्सव थायलंड इंटरनॅशनल शॉपींग कार्निव्हल 'फर्निचर आणि लाईफ स्टाईल' प्रदर्शन

नगर – उत्सव थायलंड इंटरनॅशनल शॉपींग कार्निव्हल या नावाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील विविध उपयोगी वस्तुंचा आनंदोत्सव (प्रदर्शन) १६ ते २५ ऑक्टोबर या कालावधीत शहरातील नगर–मनमाड रोडवर वृदांवन लॉन समोर व राजपाल शोरूमच्या बाजूला असलेल्या प्रागंणात भरलेला असून याचा नगरकरांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन या आनंदोत्सवाचे आयोजक, वर्ल्ड मराठा ऑगनायझेशनचे अध्यक्ष सत्यजीत सावंत यांनी केले आहे. या आंनदोत्सवात थायलंड, अफगाणिस्तान, इराण, दुबई, मलेशिया, कोरीया या देशांसह भारतातील सुमारे २५ राज्यातील स्टॉलधारक सहभागी झालेले आहेत. यात घरपयोगी व जीवनावश्यक वस्तुंचा विविध नाविन्यपूर्ण खजीना नगरकरांना लुटायला मिळणार आहे. यासोबतच विविध राज्यांच्या खाद्य संस्कृतीचे स्टॉल व लहान मुलांसह सर्वांसाठी मनोरजंनाचे विविध उपक्रम रोज होत आहेत.

विविध प्रकारचे फर्निचर, कपडे, सौदर्यंप्रसाधने, पेन्टींग, मार्बल, खेळणी अशा विविध राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिध्द वस्तु या प्रदर्शनात उपलब्ध असून नगरकरांनी या आनंदोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### रिलस्टारसाठी रोज भेटवस्तू

या आनंदोत्सवाला भेट देवून या प्रदर्शनाची रिल तयार करून आपल्या इन्स्टाग्राम या सोशल मिडियावर शेअर करेल त्याला आकर्षक भेटवस्तू देण्यात येत आहे. ज्याच्या रिलला अधिक लाईक व शेअरींग भेटतील त्याला खास भेटवस्तू देण्यात येत आहे. नगरमधील रिल बनविणाऱ्या नागरिकांनी यात सहभागी घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## जसे कर्म, तसे फळ



महिन्याची पहिली तारीख आली. हातात पगाराची रक्कम पडली. कुटुंबाची मने आनंदित झाली. ही रक्कम, हा आनंद हे कशाचे फळ मिळाले? आज एकदम नशीब खुलले की मागल्या अंगणातील पैशाचे झाड हलले ? छे! विचार केला तेव्हा लक्षात आले, की हे गेल्या महिनाभर काम केले ते आता फळले.

एक शेजारचा नोकरदार होता. पण एक तारखेला त्याच्या घरात अंधार होता. तेथे कुणाच्याही चेहऱ्यावर आनंद नव्हता. त्याचा पगार कंपनीने कापला होता. त्याने कामचुकारपणा केला होता. कंपनीचा गोपनीय व्यवहार बाहेर फोडला होता. त्याच्या बेईमानीमुळे कंपनीला तोटा आला होता. या सगळ्या कुकर्मामुळे पगार कापण्यात आला. पेरले तसे उगवते.

पूर्वी खूप धन होते. वैभव होते. पण ते कुकर्मामुळे गमावले. आता भीक मागणे नशिबी आले. दाराशी याचक येतो, तेव्हा तो काही मागतो असे तू का समजतेस? अरे, तो तुला भीक मागायला नव्हे, तर उपदेश करायला धजतो, मी पूर्वायुष्यात कुकर्म केले. पाप घडले. दारिद्य आले. तुझ्याकडे भीक मागणे प्राप्त झाले. तू धनी मी निर्धन असे युग्म जुळले. आता वाईट वागू नकोस, दुष्कृत्य करू नकोस. माझ्यासारखा होऊ नकोस, सत्कर्म कर, दान दयाधर्म यांचे पालन कर. भूतकाळात केले ते वर्तमानकाळात कामी आले. चांगले कराल तर भविष्यकाळ सुखाचा बनवाल.

हा जन्म लाभला आहे. नरदेह मिळाला आहे. तो सत्कारणी लावा. देवाला शरण या सात्त्विक गुण अंगी बाणवा. हे वाद तत्काळ सोडा. नाही तर याच जन्मी खावी लागेल नरकाची हवा. एका सज्जनाला सुबुद्धी झाली. देवळातल्या साधुला हजार रुपये दान करू असे तो म्हणाला. एका दुष्टाने ती बातमी ऐकली. त्यानी मती भ्रष्ट झाली. तो देवळात गेला. त्याने साधुच्या हातात पाचशे रुपये कोंबले. म्हणाला, एकच अट की आज यानंतर तुला मिळतील तेवढे सगळे माझे होतील.

मग तो हजार द्यायला येणाऱ्याची वाट पाहू लागला. तेवढयात एक लुटारू तेथे आला. पैसे टाका, नाही तर जीव घेतो, म्हणाला. साधुने होते जवळ ते पाचशे दिले. दुष्टाजवळ काहीच द्रव्य नव्हते. त्या बदमाशाने त्याचे प्राण घेतले.

थोड्या वेळाने हजार रुपये घेऊन दानशूर आला. दुष्टाने दिलेले साधूचे पाचशे गेले, पण हजार आले, दुष्टाचे मात्र पाचशेही गेले आणि प्राणही गेले.

– किशोर गांधी



केडगाव येथील वासन टोयोटा शोरूममध्ये विजयादशमीच्या मुहूर्तावर तब्बल ६० चारचाकी वाहनांचे विक्रमी वितरण करण्यात आले. याप्रसंगी पद्मश्री पोपटराव पवार आदी.

# वासन टोयोटामध्ये ६० गाड्यांची विक्रमी विक्री

नगर – केडगाव येथील वासन टोयोटा शोरूममध्ये विजयादशमीच्या मुहूर्तावर तब्बल ६० चारचाकी वाहनांचे विक्रमी वितरण करण्यात आले असून, आपल्या स्वप्नातील गाडी घरी नेण्यासाठी ग्राहकांनी कुटुंबासह गर्दी केल्यामुळे शोरुम परिसर दिवसभर गजबजून गेला होता. सुरक्षितता, टिकाऊपणा आणि विश्वासार्हतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या टोयोटाच्या फॉर्च्युनर आणि ग्लांझा यांसारख्या अत्याधुनिक मॉडेल्सना ग्राहकांचा तुफान प्रतिसाद मिळाला असून, या विक्रमी विक्रीद्वारे कंपनीने ग्राहकांच्या विश्वाला सलाम करत विक्रीचा नवा विक्रम प्रस्थापित केला असल्याची माहिती अनिश आहुजा यांनी दिली आहे.

# शिवम टिव्हीएसचा ३५१ दुचाकी विक्रीचा विक्रम

### ग्राहकांचा अभूतपूर्व प्रतिसाद



नगर – सावेडी येथील शिवम टिव्हीएस मध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर तब्बल ३५१ दुचाकींच्या विक्रीचा ऐतिहासिक विक्रम नोंदवण्यात आला आहे. आकर्षक ऑफर्स, भरघोस भेटवस्तू आणि ग्राहकांच्या अढळ विश्वासाच्या बळावर शिवम टिव्हीएसने यंदाच्या दसऱ्यात विक्रीचा नवा टप्पा गाठला आहे. दुचाकी खरेदीदारांसाठी २५ हजार रुपयांपर्यंत डिस्काउंट, ५ टक्के कॅशबॅक, ४,२०० रुपयांपर्यंत भेटवस्तू आणि अवघ्या ४,९९९ रुपयांपासून डाऊन पेमेंटची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती. विशेष म्हणजे, अपाचे खरेदीवर डाऊन पेमेंट शोरूमकडून भरण्याची विशेष ऑफर ग्राहकांसाठी मुख्य आकर्षण ठरली.

पेट्रोल आणि इलेक्ट्रिक दुचाकींच्या विविध पर्यायांमुळे ग्राहकांना आपल्या बजेटनुसार वाहन निवडण्याची संधी मिळत असून टीव्हीएस जुपिटर, रेडिऑन आणि रायडरला मोठी पसंती तर इलेक्ट्रिक वाहनांमध्ये आयक्यूब आणि ऑर्बिटलला प्रतिसाद मिळाला आहे.

१९९२ पासून विश्वासाची परंपरा जपत शिवम टिव्हीएस ने केवळ दुचाकींची विक्री नव्हे, तर ग्राहकांचे समाधान आणि विश्वास जपण्याला नेहमीच प्राधान्य दिले आहे. पेट्रोल व इलेक्ट्रिक दुचाकींसाठी स्वतंत्र वर्कशॉपची सुविधा असणाऱ्या शिवम टिव्हीएस वरील ग्राहकांच्या विश्वासाची पावती म्हणजेच ही विक्रमी विक्री ठरली आहे. झोपडी कँटीनसमोर, सावेडी, अहिल्यानगर येथील शिवम टिव्हीएस शोरूममध्ये या ऑफर्स अटी व शर्तीनुसार लागू असून अधिक माहितीसाठी ९१३००३०००३ किंवा ७७९६६८५५०० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



श्री सालासर ह्युंदाई शोरूममध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर तब्बल ४२ चारचाकी वाहनांची विक्रमी विक्री झाली.

# श्री सालासर ह्युंदाई मध्ये ४२ गाड्यांची विक्रमी विक्री!

नगर – एमआयडीसी परिसरातील श्री सालासर ह्युंदाई शोरूममध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर तब्बल ४२ चारचाकी वाहनांची विक्रमी विक्री झाली. दसऱ्याच्या दिनी नवीन वाहन घरी नेण्याचा आनंद अनेक ग्राहकांनी घेतला. ह्युंदाईच्या विविध मॉडेल्सला ग्राहकांनी विशेष पसंती दर्शवली असून, आकर्षक सणासुदीच्या योजना, अर्थसहाय्याच्या सोप्या सुविधा आणि विश्वासार्ह सेवेमुळे या खरेदीला प्रतिसाद मिळाला. एकाच दिवसात झालेली ४२ वाहनांची विक्री हा ग्राहकांच्या विश्वासाचा आणि समाधानाचा ठळक दाखला मानला जात आहे. मिळालेल्या या प्रतिसादाबद्दल व्यवस्थापनाने ग्राहकांचे आभार मानले असून, भविष्यातही अशीच दर्जात्मक सेवा आणि सुविधा देण्याची ग्वाही दिली आहे.

# महिंद्रा सबलोकमध्ये एकाच दिवशी ६५ गाड्यांची विक्रमी विक्री!



दसऱ्याच्या मुहूर्तावर महिंद्रा सबलोकमध्ये एकाच दिवशी ६५ गाड्यांची विक्रमी विक्री झाली.

नगर – नगर शहरातील एमआयडीसी परिसरातील महिंद्रा सबलोक शोरूममध्ये दसऱ्याच्या विजयपर्वावर ग्राहकांचा प्रतिसाद पाहायला मिळाला असून, एकाच दिवसात तब्बल ६५ गाड्यांची विक्रमी विक्री झाली आहे. महिंद्रा ब्रँडवरील अढळ विश्वास आणि सबलोक शोरूमच्या दर्जेदार सेवेमुळे खरेदीचा हा नवा उच्चांक नोंदवला गेला. दसऱ्याच्या मुहूर्तावर आपली स्वप्नातील गाडी घरी नेण्यासाठी सकाळपासूनच शोरूममध्ये ग्राहकांची गर्दी झाली होती.

नवीन गाडीच्या चाव्या हातात घेताना ग्राहकांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावरील आनंदामुळे शोरूममध्ये उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. दसऱ्याच्या मुहूर्तावर ६५ गाड्यांची विक्री होणे हा ग्राहकांनी आमच्यावर दाखवलेल्या विश्वासाचा सन्मान असून, ग्राहकांना तत्पर सेवा देण्यासाठी संपूर्ण टीमने विशेष नियोजन केले होते, असे प्रतिपादन शोरूमचे जनरल मॅनेजर बाबासाहेब दारकुंडे यांनी केले. या अभूतपूर्व विक्रीमुळे महिंद्रा सबलोकच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून व्यवस्थापनाने ग्राहकांचे आभार मानले आहेत.

# नवरात्रीत सामाजिक भान जपत रंगली नवदुर्गा वेषभूषा स्पर्धा

### २४ ऑक्टोबरला बक्षीस वितरण



जागरूक नागरिक मंच व कलाकार कट्टा यांच्यातर्फे आगरकर मळा येथील विरंगुळा मैदानावर नवदुर्गा वेषभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

नगर – नवरात्रीचा सर्वत्र जल्लोष सुरू असताना १९७२ नंतरच्या भीषण दुष्काळाची जाणीव ठेवून सण–उत्सवांत सामाजिक भान जपावे, या उद्देशाने जागरूक नागरिक मंच व कलाकार कट्टा यांच्यातर्फे सुहासभाई मुळे यांच्या पुढाकारातून आगरकर मळा येथील विरंगुळा मैदानावर नवदुर्गा वेषभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत ५ ते ५० वयोगटातील मुली आणि महिलांनी सहभाग नोंदवला होता. दुष्काळाची भीषणता, पाणीटंचाई आणि वाढते प्रदूषण लक्षात घेता, सहभागी स्पर्धकांनी एकत्र येत प्रबोधनात्मक श्लोकपठण केले.

याप्रसंगी नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा व दुष्काळ निवारणासाठी उपाययोजना कराव्यात, असा संदेश परीक्षक प्रा. निर्मला भंडारी यांनी दिला.

सण साजरे करताना बेधुंद जल्लोषाऐवजी सामाजिक व सांस्कृतिक भान जपणे गरजेचे असल्याचे मत आयोजक सुहासभाई मुळे यांनी व्यक्त केले.

अशा प्रबोधनात्मक स्पर्धांमधून शांत आणि पवित्र संस्कृती जपली जात असल्याचे सांगत नगरसेविका गीतांजली काळे यांनी भविष्यातही अशा उपक्रमांची ग्वाही दिली.

स्पर्धेतील विजेत्या पंखुडी तिरवाडी, वरदा पाटील, समृद्धी जोशी, काव्या उदावंत, किरण खोडे, गौरी नगरकर, तन्वी चौधरी, शिवन्या भापकर, शिवानी गायकवाड व रितू फिरोदिया यांना घोषित करण्यात आलेली बक्षीसे २४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता रेडिओ नगर हॉल येथे प्रदान केली जाणार आहेत.



नवरात्र उत्सवानिमित्त विनायकनगर येथील श्री वैष्णव देवी नवरात्र उत्सव समितीच्या वतीने आयोजित होम मिनिस्टर कार्यक्रमात संगीता गुंदेचा या पैठणीच्या मानकरी ठरल्या.

# संगीता गुंदेचा ठरल्या होम मिनिस्टर पैठणीच्या मानकरी

नगर – विनायकनगर येथील श्री वैष्णव देवी नवरात्र उत्सव समितीच्या वतीने नवरात्र उत्सवानिमित्त श्री वैष्णोदेवी माता मंदिरसमोर आयोजित होम मिनिस्टर कार्यक्रमांमध्ये ७० पेक्षा जास्त महिलांनी सहभाग घेतला. यामध्ये महिलांचा डान्स, हवेत फुगे उडवणे, दोरीमध्ये ठेवलेले दोरे हाताने काढणे, पत्रावळी पायात घालून चालणे, ग्रुपमध्ये महिला एकत्रित करणे अशा अनेक गेम खेळ करून कार्यक्रमाची रंगत वाढत गेली.

शहरातील वृत्तपत्र विक्रेते व विनायकनगर येथील रहिवासी चेतन गुंदेचा यांच्या पत्नी संगीता गुंदेचा यांनी उत्कृष्ट खेळ सादर करून तृतीय क्रमांक मिळवत मानाची समजली जाणारी पैठणी पटकावली. परंतु त्यांनी मनाचा मोठेपणा दाखवत बक्षीस मिळालेली पैठणी श्री वैष्णोदेवी मातेच्या चरणी अर्पण करण्याचा मानस व्यक्त करून मंदिराची सेवा करणाऱ्या बनकर काकू यांच्याकडे पैठणी सूर्पद केली.

प्रथम क्रमांकाचे बक्षीस शितल कमलेश भंडारी यांना सोन्याची नथ, तर द्वितीय क्रमांकाचे बक्षीस कविता साळुंखे यांना चांदीचे नाणे भेट देण्यात आले. सीमा किरण गांधी यांना लकी ड्रॉ मधून आकर्षक नेकलेस तर होम मिनिस्टर मध्ये सहभाग घेतल्याबद्दल सर्वात वयस्कर ज्येष्ठ महिला म्हणून गुलाबाई भंडारी यांना आकर्षक भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

उपस्थित असलेल्या भाग्यवान महिलांना सुद्धा लकी ड्रॉद्वारे आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या.

पैठणीच्या विजेत्या संगीता गुंदेचा यांना मंडळाचे अध्यक्ष सचिन म्हस्के, संदीप नन्नवरे व पोखरणा ज्वेलर्सचे संचालक आकाश पोखरणा यांच्या उपस्थितीत पैठणी भेट देण्यात आली. सूत्रसंचालन संदीप नन्नवरे यांनी केले. सचिन म्हस्के यांनी आभार मानले.

यावेळी मंडळाचे सभासद पंकज मुथा, सुशील शिंदे, कमलेश भंडारी, आरिफ पठाण, राहुल मेढे, मनोज दोशी, किरण लोंढे, ओम भगत, महेंद्र लोढा, साहिल साळुंखे, शिवम लोखंडे, विनय कुरवा, ओम भगत, ओम भंडारी, संकेत गुंदेचा, वेदांत दूर्षिंग, किशोर श्रीश्रीमाळ, संदीप जगताप, राजेश राठी, प्रसाद वाघमारे, पियुष बलदोटा, सुशील भंडारी, आदर्श कटारिया आदींसह मंडळाचे कार्यकर्ते व सभासद उपस्थित होते.




एमआयडीसीतील श्री रेणुकामाता देवस्थान येथे २५ फुटी रावणाचे दहन करण्यात आले. यावेळी आतषबाजीने आसमंत उजळून निघाला. रावण दहन पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

# निरंकारी मिशनचा २३ ऑक्टोबर पासून वार्षिक संत समागम; अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातून हजारो अनुयायी रवाना




नगर – सद्गुरू माता सुदीक्षा जी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या छत्रछायेखाली निरंकारी मिशनच्या वतीने चार दिवसीय ७९वा वार्षिक संत समागमाचे भव्य आयोजन निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा, हरियाणा येथे २३ ते २६ ऑक्टोबर पर्यंत होणार असून संत समागमात नगर शहर व नगर जिल्ह्यातून तसेच अहिल्यानगर क्षेत्र (३६अ) अंतर्गत येणाऱ्या शाखा बीड, परभणी, हिंगोली, नांदेड आदि ठिकाणाहून हजारो भक्तगण उद्या रवाना होणार असल्याची माहिती मिशनचे अहिल्यानगर झोन प्रमुख हरीश खुबचंदानी यांनी दिली.

या समागमात प्रत्येक पाऊल मानव कल्याणाच्या दिशेने अग्रेसर होईल, प्रत्येक भाव समर्पणात परिवर्तीत होईल आणि प्रत्येक हृदय प्रेमाच्या त्या दिव्यज्योतीने प्रकाशित होईल जी मानवतेला एकत्व, सद्भावना आणि प्रभूभक्तिच्या सूत्रात बांधण्याचा संदेश देते, जिथे ब्रह्मज्ञानाने चेतना जागृत होते, जिथे सेवा हाच जीवनाचा संकल्प बनतो तिथेच संत समागम आत्मिक जागृतीचा असा पवित्र उत्सव बनतो, जो माणसाला स्वतःच्या आत डोकावून पाहण्याची आणि परमात्म्याशी जोडले जाण्याची प्रेरणा देतो, याचाच दिव्य अनुभव घेण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो अनुयायी तसेच विदेशातील हजारो श्रद्धाळू या पावन प्रसंगी एकत्र येऊन सत्संग, सेवा, प्रेम आणि भक्तीचा अनुभव घेण्यासाठी या दिव्य आध्यात्मिक संमेलनात सहभागी होणार आहेत.या संत समागमात शोभायात्रा, सेवादल रॅली, सत्संग, भक्तीगीते, बहुभाषिक कवीदरबार तसेच राजपिता व सदगुरू माताजींचे दररोज सत्राच्या शेवटी प्रवचन होतील.

शेकडो एकरच्या निरंकारी आध्यात्मिक स्थळ येथे उभारण्यात आलेले भव्य, आकर्षक असे मुख्य प्रवेशद्वार विशेष आकर्षणाचे केंद्र बनले आहे, तसेच सुरळीत संचालन, सहज ये–जा आणि श्रद्धाळूंना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने संपूर्ण परिसर चार प्रमुख भागांमध्ये विभागण्यात आला आहे.सेवादल सदस्यांनी व अनुयायींनी कठोर व निःस्वार्थ भावनेने केलेल्या सेवाकार्यामुळे या स्थळाला एका सुंदर, भव्य आध्यात्मिक नगरीचे स्वरूप प्राप्त झाले आहे तसेच निरंकारी प्रदर्शनी, प्रकाशन स्टॉल, लंगर, कॅन्टीन, प्याउ, पार्किंग आदि सुविधा उपलब्ध करण्यात आल्या असून सर्व व्यवस्था निरंकारी सेवादल सदस्य तन्मयतेने पार पाडतात.

## जाहीर प्रगटन

तमाम लोकांस सदर जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल **शेख इम्रान अयाज, रा.दक्षिण मुखी, हनुमान मंदिर जवळ, सर्जे पुरा, अहिल्यानगर.** यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रांवरुन कळविण्यात येते की, मिळकत वर्णन : जिल्हा अहमदनगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे शहरनगर येथील सिटी सर्व्हे नं.६४४८ चे एकुण क्षेत्र २३६.६ चौ.मी. ही संपुर्ण मिळकती आमच्या अशिलाच्या वडिलोपार्जित मिळकत असुन त्यामध्ये मुस्लिम व्यक्तीगत कायद्यान्वये अद्यापपावेतो सरस–निरस मानाने वाटप झालेले नव्हते व नाही व अशा परिस्थितीमध्ये शेख लियाकत मोहम्मद, शेख समीर मोहम्मद, सुमय्या समीर शेख व शहनाज लियाकत शेख यांनी सदर मिळकतीपैकी १६०.४० चौ.मी. क्षेत्र वेगवेगळ्या खरेदीखतान्वये खरेदी घेतली व त्याविरुध्द आमचे अशिल व इतर यांनी अहमदनगर येथील दिवाणी न्यायालयात रे.मु.नं.४१५/२०१४ हा दावा दाखल केला व सदर दावा प्रलंबित असतेसमयी शेख लियाकत मोहम्मद, शेख समीर मोहम्मद, सुमय्या समीर शेख व शहनाज लियाकत शेख यांनी अनाधिकृतपणे सदर मिळकतीचा पोटहिस्सा करुन सिटी सर्व्हे नं.६४४८/१ व ६४४८/२ असे दोन पोटहिस्से केले व त्यापैकी सिटी सर्व्हे नं.६४४८/२ चे क्षेत्र १६०.४० चौ.मी. मध्ये शेख लियाकत मोहम्मद, शेख समीर मोहम्मद, सुमय्या समीर शेख व शहनाज लियाकत शेख यांनी आपल्या नावाची नोंद करुन घेतली. परंतु शेख लियाकत मोहम्मद, शेख समीर मोहम्मद, सुमय्या समीर शेख व शहनाज लियाकत शेख यांना १६०.४० चौ.मी क्षेत्राचा कुठलाही कायदेशीर मालकी हक्क मिळत नाही. तसेच सदर प्रलंबित दावा रे.मु.नं.४१५/२०१४ बाबतची माहिती अॅड. राजेंद्र एम संकलेचा यांच्या मार्फत दै. नवा मराठा या वर्तमान पत्रामध्ये दि.२२/०३/२०१७ रोजी जाहिर नोटीस प्रसिध्द केलेली होती व त्याचप्रमाणे सदर दावा नोंदणी करुन लिज पेंडन्सीची नोंद सदर सिटी सर्व्हे नं.६४४८/२ च्या उता–यावर केली होती. सदर दावा रे.मु.नं.४१५/२०१४ काही तांत्रिक कारणामुळे डिसमिस झाला व त्याचा गैरफायदा घेऊन शेख लियाकत मोहम्मद, शेख समीर मोहम्मद, सुमय्या समीर शेख व शहनाज लियाकत शेख यांनी जाणुन–बुजुन सिटी सर्व्हे नं.६४४८/२ चे क्षेत्र १६०.४० चौ.मी. मोनलिस हाईटस या नावाची इमारत बांधली व त्यामध्ये ६ दुकाने व २ फ्लॅट आहेत. सदर संपुर्ण इमारत बेकायदेशीर असुन त्याबाबत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला न घेता व भोगवटा प्रमाणपत्र न घेताच शेख लियाकत मोहम्मद, शेख समीर मोहम्मद, सुमय्या समीर शेख व शहनाज लियाकत शेख यांनी ग्राऊंड फ्लोअरवरील दुकान नं.१ ते ६ हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनीम हुजेफा सालुजी व फर्स्ट फ्लोअरवरील फ्लॅट नं.१ नदीम दाऊद शेख व आसमा नदीम शेख यांना विक्री केलेला आहे व सेकंड फ्लोअरवरील फ्लॅट नं.२ हा फ्लॅट यासर इम्तियाज शेख व आयेशा यासर शेख यांना विक्री केलेला आहे. सदर सिटी सर्व्हे नं.६४४८/१ व ६४४८/२ हे संपुर्ण मिळकतीमध्ये आमच्या अशिलाच्या कुटुंबाचा मालकीहक्क, अधिकार व क्षेत्र विभागणी करुन सरस–निरस मानाने स्वतंत्रपणे मिळालेले नाही व त्याकामी सदर मिळकतीमध्ये आमच्या अशिलाचा हिस्सा वाटप करुन मिळण्याकामी आमच्या अशिल योग्य ती न्यायालयीन कारवाई करुन वाटपाचा दावा दाखल करण्याच्या प्रयत्नात व तयारीत आहे. परंतु आमच्या अशिलास खात्री लायक समजले आहे की **दुकान नं.१ ते ६ हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनीम हुजेफा सालुजी यांनी व फर्स्ट फ्लोअरवरील फ्लॅट नं.१ नदीम दाऊद शेख व आसमा नदीम शेख यांनी व सेकंड फ्लोअरवरील फ्लॅट नं.२ हा फ्लॅट यासर इम्तियाज शेख व आयेशा यासर शेख** यांनी जाणुन–बुजुन विक्री करण्याच्या तयारीत आहे व त्यामुळे विनाकारण गंतागुंत निर्माण होण्याची शक्यता आहे, कारण सदर मिळकतीबाबत कुणीही व्यवहार केल्यास संबंधित खरेदीदारास कुठल्याही प्रकारची कायदेशीर मालकी व टायटल प्राप्त होणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. त्यामुळे कुणाचीही आर्थिक फसगत होऊ नये व विनाकारण वाद उपस्थित होऊ नये या प्रामाणिक हेतुने आमचे अशिल प्रस्तुत जाहिर प्रगटनाद्वारे तमाम लोकास कळवितात की सदर सिटी सर्व्हे नं.६४४८/२ मधील मोनलिस हाईटस या इमारतीमध्ये **दुकान नं.१ ते ६ बाबत हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनीम हुजेफा सालुजी व फर्स्ट फ्लोअरवरील फ्लॅट नं.१ बाबत नदीम दाऊद शेख व आसमा नदीम शेख व फ्लॅट नं.२ बाबत यासर इम्तियाज शेख व आयेशा यासर शेख** यांचे बरोबर कोणीही मिळकत खरेदी विक्रीचे व्यवहार करु नये अथवा मिळकतीबाबत कुठल्याप्रकारे आर्थिक व्यवहार, करार इत्यादी करु नये अगर केल्यास तो आमचे अशिलावर मुळीच बंधनकारक राहणार नाही व संबंधीतांना मिळकतीमध्ये कुठलेही कायदेशीर मालकीहक्क व अधिकार व टायटल मुळीच प्राप्त होणार नाही व अगर मिळकती खरेदी केल्यास मिळकत खरेदी घेणार व विक्री करणार यांच्या विरुध्द आमच्या अशिलास कायदेशीर सल्ला मिळेल त्याप्रमाणे आमच्या अशिल योग्य ती दिवाणी व फौजदारी कारवाई करतील याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणुक होऊ नये या प्रमाणे हेतुने प्रस्तुतचे जाहिर प्रगटन प्रसिध्दीस दिले असे.

ता. २१/१०/२०२६. **अॅड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर. मो. नं. ९०११६७८९९९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे खाली नमुद विद्यमान मालक, यांनी सदर मिळकत आमच्या अशिलांना विक्री देण्याचे कबूल केले असून, सदर व्यवहारापोटी आमच्या अशिलांनी विद्यमान मालकांना संपुर्ण रक्कम अदा केली आहे व ती त्यांनी स्वीकारली आहे. अटी व शर्तीची पुर्तता झाल्यानंतर सदर मिळकतीचे खरेदीखत करण्यात येणार आहे. सदर मिळकतीवर एल.आय.सी. हाउसिंग फायनान्स लिमिटेड यांचेकडील कर्जाचा बोजा वगळता सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व कोणत्याही बोजापासून मुक्त असल्याचे विद्यमान मालकांनी कळविले आहे.

तथापि, सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीसपत्र, विक्री/साठेकरार, जप्ती, बँक बोजा अथवा चार्ज, भाडेकरार, मदार/हायपोथीकेशन, मनाई हुकूम, स्थगिती आदेश, पोटगीचा हक्क, लीन, इजमेंट, बेनामी व्यवहार किंवा अथवा अन्य कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा अथवा वाद असल्यास, संबंधित व्यक्तींनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **८ दिवसांच्या** मुदतीमध्ये योग्य त्या कागदपत्रांच्या प्रतींसह खाली नमूद पत्त्यावर समक्ष किंवा रजिस्टर्ड पोस्टाने लेखी हरकत सादर करून त्याबाबत समाधानकारक पुरावा द्यावा. विहित मुदतीत कोणतीही हरकत किंवा दावा प्राप्त न झाल्यास, आमचे अशिल उपलब्ध नोंदी व प्राप्त माहितीच्या आधारे पुढील खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही दाव्याची अथवा हरकतीची जबाबदारी आमच्या अशिलांवर राहणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन** – तालुका व जिल्हा अहिल्यानगर, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, मा. दुय्यम निबंधक, अहिल्यानगर यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे चाहुराणा खुर्द येथील गट नं. २०/२अ२/२०/३ब२१/१ब२/१ब ३/ प्लॉट ९ ते ११/१ व १/१ मधील प्लॉट नं. ११ चे क्षेत्र ४ आर ३७.१० चौ. मी. (म्हणजेच ४३७.१० चौ.मी.) तसेच यावर बांधण्यात आलेल्या निवासी बंगल्याचे एकुण बांधकाम क्षेत्र ३०६.४१ चौमी. ही प्लॉट व त्यावरील बांधकासह संपुर्ण मिळकत. यांसी सदर प्लॉट नं. ११ ची चतुःसिमा
पूर्वेस – प्लॉट नं. ९ते११/१/१/१ व ९ते११/१/१/२ पैकी क्षेत्र
दक्षिणेस–१२.२० मीटर रुंद रस्ता पश्चिमेस– प्लॉट नं. १२
उत्तरेस–प्लॉट नं. १९ पैकी क्षेत्र
सदर मिळकतीमध्ये असलेले लाईट मीटर, नळ कनेक्शन, सर्व तद्नुषंगिक वस्तु व उपभोग्य बाबी, ये–जा व वहिवाटीचे हक्क तसेच रस्ता/प्रवेश हक्क यासह, काहीही राखून न ठेवता सदर संपुर्ण मिळकत अभिप्रेत आहे.
**सदर मिळकतीचे विद्यमान मालक– श्री. आनंद वसंत मुथा,** रा. नगर–पुणे रोड, माणिकनगर, ता. जि. अहिल्यानगर दि. २१/१०/२०२६

**अॅड. विजय आर.गुंदेचा,**
(बी.कॉम.एल.एल.एम.सी.एस.डी.टी.एल.डी.एल.एल.अॅण्ड एल.डब्ल्यु, जीडीसी, अॅण्ड ए.)
**अॅड. किमया वि.गुंदेचा** (बी.एस.एल.एल.एल.बी.जी.डी.सी अॅण्ड ए)
ऑफिस नं. २०८, ग्राऊंड फ्लोअर, करण कोर्ट बिल्डींग, जुन्या जिल्हा न्यायालया समोर, दादा चौधरी विद्यालय जवळ, अहिल्यानगर – ४१४ ००१, मो.नं. ९२७१४६१८४६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेले प्लॉटस् बाबत विद्यमान मालक यांनी आमचे आशिलांसोबत व्यवहाराची बोलणी झालेली असून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर प्लॉटस् निर्वेध, निजोखमी आहेत, असे खरेदी देणारांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविणेत येते की, सदर प्लॉटसबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधीतांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्यावर समक्ष लेखी अथवा रजिष्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे प्रमाणित नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. विहित मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी

**–: परिशिष्ट मिळकत वर्णन :–**
जिल्हा अहिल्यानगर, पोट तुकडी नगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, मे. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्य कक्षेतील, मौजे केडगांव येथील प्लॉटस् मिळकती खालील वर्णनाच्या
स.नं. ३३३/३/३३४/३ मधील प्लॉटस्

| हिस्सा नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ. मी. | यांसी एकत्रित चतुःसिमा पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | ३४ | १८६–९३ | ९ मी. रस्ता | ४.५० मी. रस्ता | ९ मी. रस्ता | सर्व्हे नं. ३३३/२ |
| १६ | ३५ | १७६–०० | | | | |
| १७ | ३६ | १७६–०० | | | | |
| १८ | ३७ | १७६–०० | | | | |
| १९ | ३८ | १७६–०० | | | | |
| २० | ३९ | १५६–५६ | | | | |
| १४ | ४० | १४८–४८ | | | | |
| १३ | ४१ | १७६–०० | | | | |
| १२ | ४२ | १७६–०० | | | | |
| ११ | ४३ | १७६–०० | | | | |
| १० | ४४ | १७६–०० | | | | |
| ९ | ४५ | १८६–९३ | | | | |

येणेप्रमाणे प्लॉटस् मिळकती
सदर मिळकतीचे विद्यमान मालक
श्री. सुजित यशवंत आगरकर,
रा. अहिल्यानगर
दि.२१/१०/२०२६

**अॅड. राजेंद्र पी. शेलोत**
**अॅड. हर्षल राजेंद्र शेलोत**
'अर्हम' प्लॉट नं. २६ आदिनाथ कॉलनी, राऊत मळा, अहिल्यानगर, मो. ९४२२२२३४४१

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **१. प्रज्ञा विवेक होशिंग, २. विजय वासुदेवराव होशिंग, दोघेही रा. निलायम होसिंग सोसायटी, नगर – पुणे रोड, अहिल्यानगर ३. निलेश विलास कवाष्टे, रा. हरीहरेश्वर मंदिरा जवळ, बागरोजा हडको, अहिल्यानगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन त्यांना सदर मिळकत विक्री करण्यांचा पूर्ण हक्क व अधिकार आहे. तसेच व्यवहारापोटी विसार म्हणुन आमचे आशिला कडुन रक्कम देखील घेतलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याचे विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर प्लॉट मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध,ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**
**मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील, मौजे केडगांव येथील बिगरशेती प्लॉट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे –
**सर्व्हे नंबर ६०/१/२/३ मधील प्लॉट नं. १ चे क्षेत्र ४४५.६२ चौ.मीटर हा संपूर्ण प्लॉट.**
यासी चतुःसीमा –
पूर्वेस –६ मीटर रुंदीचा रस्ता दक्षिणेस –प्लॉट नं. २
पश्चिमेस– लागू सर्व्हे नंबर उत्तरेस – रोड

**अॅड. सचिन आसाराम भोजने** नोटरी पब्लिक (भारत सरकार)
**अॅड. प्रियंका अण्णासाहेब खाटेकर**
पत्ता – सावेडी, अहिल्यानगर, मो. नं. ८७८८५५४२९१, ९४०५०३५८२९

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **सि.आय.व्ही. को–ऑपरेटीव्ह हाउसिंग सोसायटी लि. चे सभासद फिरोज शफि खान रा. घर नं. ७५०/ए, मंगल गेट, बापुसाहेब दर्गा समोर, शफी गुड्स ट्रान्सपोर्ट अहिल्यानगर (अहमदनगर)** यांचे मालकीची असुन सदर मिळकतीचा व्यवहार आमचे अशिला बरोबर झालेला असुन लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे चालु वाद, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, जप्ती, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क, हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **(सात)** दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल. याची नोंद घ्यावी. दि. २१/१०/२०२६.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णनः**– जिल्हा अहिल्यनगर सब.डि.ता.नगर पैकी अहमदनगर येथील महानगरपालिका हद्दीतील **मौजे भिंगार येथील सि.आय.व्ही. को–ऑपरेटीव्ह हाउसिंग सोसायटी , मुकुंदनगर** या भागातील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | चौ.मीटर |
|---|---|---|
| ३२५/१/३२५/२अ | २८ | २८५.५१ |

यापैकी उत्तरेकडील बाजुचा प्लॉट त्याचे क्षेत्र १४२.७५५ चौ.मी. मिळकतीबाबत.
(प्रस्तावित सब डिव्हीजन प्लॅन प्रमाणे प्लॉट नं. २८A या संपुर्ण प्लॉट बाबत)
**यांसी चतुःसिमा–**
पुर्वेस – प्लॉट नं. ३४
दक्षिणेस – प्लॉट नं. २८ पैकी उर्वरीत क्षेत्र (प्रस्तावित सब डिव्हीजन प्लॅन प्रमाणे प्लॉट नं. २८B)
पश्चिमेस – ७.६ मीटर रस्ता उत्तरेस – प्लॉट नं. २७
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

**अॅड. तनवीर एम.शेख** नोटरी पब्लिक (भारत सरकार)
**अॅड. फरहान आसिफ शेख**
कस्तुरी प्लाझा शेजारी, डावरे गल्ली, अहमदनगर मो.नं.९२७०४६४६००/ ९७६६१४५९३२

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली शेत मिळकत ही विद्यमान मालक **कांतीलाल रतनशी पटेल व जयंतीलाल रतनशी पटेल दोघे रा. अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाशी व्यवहाराची बोलणी केली असून, विसार म्हणून रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदीखत करुन देण्याचे ठरवले आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :–**
डि।। अहिल्यानगर सब डि।। व ता. नगर पैकी जिल्हापरिषद हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे निंबळक येथील शेत जमिनीचा सर्व्हे नं. ४९४ याचे क्षेत्र २ हे. ४३आर. याचा आकार ९रु. ८७पैसे. ही संपूर्ण मिळकत.**
**यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे :–**
पुर्वेस – रस्ता, दक्षिणेस – स.नं. ४९५,
पश्चिमेस – स.नं. ५५२, उत्तरेस – स.नं. ४९२/४९३,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.
अहिल्यानगर, दिनांक – २१/१०/२०२६

**अॅड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**अॅड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस– फ्लॅट नं. ४, गुरुप्रसाद अपार्टमेंट
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकत ही विद्यमान मालक **पद्मावती अण्णासाहेब साळवे, स्मिता अण्णासाहेब साळवे (लग्नापुर्वीचे नाव) स्मिता अमित भारशंकर (लग्नानंतरचे नांव) दोघे.रा. फ्लॅट नंबर २, अमित विहार अपार्टमेंट, अमित बँक कॉलनी रासनेनगर, सावेडी, अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे. सदर मिळकतीवर सदर फ्लॅट मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेली मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर फ्लॅट मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकतीवर स्टार फायनान्स या फायनान्सचे कर्ज आहे व्यातिरिक्त सदर मिळकत निर्वेद व निजोखमी आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्टकारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात (७) दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर फ्लॅट मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :–**
डि अहिल्यानगर सब डि।। ता. नगर अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील पैकी **मौजे सावेडी येथील सर्व्हे क्र. १४ मधील प्लॉट नं. ७२ याचे एकूण क्षेत्रफळ ३९५.१० चौ. मी. यांवर बांधकाम केलेल्या अमित विहार अपार्टमेंट या अपार्टमेंट मधील बेसमेंट फ्लोअर वरील फ्लॅट नं. २ याचे बिल्टअप एरिया ४४.७५ चौ.मी. ही संपूर्ण फ्लॅट मिळकत**
**यांसी चतुःसिमा :–**
पुर्वेस : फ्लॅट नंबर १ व खुली जागा, दक्षिणेस : खुली जागा व प्लॉट नंबर ७१,
पश्चिमेस : बाजूची खुली जागा व अंतर्गत रस्ता व पार्किंग स्पेस,
उत्तरेस ; जीना व पार्किंग स्पेस,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.
दि. २१/१०/२०२६, अहिल्यानगर

**अॅड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**अॅड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस– गाळा नं. ४ महालक्ष्मी चेंबर्स
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठामध्ये नमूद मिळकत ही **संजय चांदमल बोथरा,वांबोरी.ता. राहुरी,जि. अहिल्यानगर** यांचे मालकीची असून सदर मिळकतीचा ते मालकी हक्काने शांततामय कब्जा, वहिवाट, उपभोग घेत असल्याची खात्री व भरवसा त्यांनी आमच्या अशिलांना दिला आहे. विद्यमान मालकांनी सदर मिळकत आमचे अशिलांस कांयमखुष खरेदी हस्तांतर करून देण्याचे ठरविलेले असुन त्या प्रमाणे व्यवहारही नक्की झालेला असुन विसारापोटी मोठी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी, विनबोजाची असल्याचा विश्वास व भरवसा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. यदाकदाचित कोणाचेही, कोणतेही तक्रार अगर हरकत, गहाण, दान, पोटगी, साठेखत, अव्वल जप्ती,दावा कोर्ट कारवाई, मनाई हुकूम, वहिवाट, बोजा, कर्ज अथवा इतर कोणताही हक्क, हितसंबंध अथवा अधिकार असल्यास ही नोटस प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसाच्या आत खालील दिलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी समक्ष भेटुन खात्री पटवुन दयावी अन्यथा आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मग कुणाचीही तक्रार चालणार नाही. मुद्दामहून कोणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दीस दिली आहे.

**परिशिष्ट**
**१) मिळकतीचे वर्णन :**– डि.अहिल्यानगर सब डि.ता.नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे नालेगांव येथील स.नं.५५/३/ प्लॉट २२/ हिस्सा ५ याचे क्षेत्र २६६.३४ चौ.मीटर हा संपूर्ण खुला प्लॉट.
**यासी चतुःसिमा**
पूर्वेस :– प्लॉट नं. १, दक्षिणेस :– प्लॉट नं. २१,
पश्चिमेस :– ९ मीटर रोड, उत्तरेस :– ९ मीटर रस्ता,
येणेप्रमाणे चर्तु:सिमापुर्वक मिळकत, त्यातील तदंगभुत वस्तुसह काहीएक राखुन न ठेवता.
तारीख–२१/१०/२०२६, अहिल्यानगर

**अॅड.दिपक पोपटराव धिवर**
चेंबर नं. १०९, लॉयर्स चेंबर्स, जुने जिल्हा न्यायालय आवार, अहिल्यानगर
मो. ८९९९७४७१२१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटिसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **चंद्रकला दत्तात्रय येलुलकर रा. सौरभ नगर, भिंगार, अहिल्यानगर** यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतीचा आमचे अशिल यांचे बरोबर खरेदीचा व्यवहार ठरला असून सदर मिळकतीच्या खरेदीपोटी आमच्या अशिलाने विद्यमान मालक यांना विसारापोटी रक्कम दिलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम व बोजा विर्हित असून तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध नसल्याबाबतची खात्री व भरवसा विद्यमान मालक यांनी दिला आहे. तथापि सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, तोंडी, अथवा लेखी करार, खरेदीखत, साठेखत, लिज, इजमेंट, मनाईहुकूम, बक्षीस, वारस हक्क, अटॅचमेंट, खासगी अथवा सरकारी, निमसरकारी बोजा असल्यास कोणत्याही स्वरुपात हक्क अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध होताच **७ दिवसांच्या** आत कागदोपत्री पुराव्यासह खाली दिलेल्या पत्यावर कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, असे समजून अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे गृहित धरून व सदर मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम आहे, असे ग्राह्य धरून आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**– डि.अहिल्यानगर सब डिव्हीजन व तालुके अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे बुऱ्हाणनगर** येथील बिनशेती प्लॉट मिळकत खालील प्रमाणे वर्णनाची–

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| **१५/१/१ ब** | **२८** | **१५३.९२ चौ. मी.** |

**हा विद्यमान मालक यांच्या मालकीचा संपूर्ण प्लॉट या प्लॉट मिळकतीबाबत .**
**यांसी चतुःसिमा खालील प्रमाणे**
पुर्वेस – प्लॉट नंबर ९९ दक्षिणेस – सर्व्हे नंबर १५/१/१क
पश्चिमेस – अंतर्गत रस्ता उत्तरेस – अंतर्गत रस्ता
येणेप्रमाणे चतु:सिमा पूर्वक बिनशेती प्लॉट मिळकत यामधील वागणुकीच्या,वहिवाटीच्या येणे–जाणे हक्कासह काही एक राखून न ठेविता असे.

**अॅड. सचिन चंद्रकांत फुलसौंदर**
ऑफिस– तळ मजला, आनंद हाईट्स,
जुने जिल्हा न्यायालयासमोर, अहिल्यानगर. मो. नं. ९९२२२२७१७८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार केलेला आहे. सदर मिळकत ही विद्यमान मालक यांचे मालकीची असुन त्यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **१५** दिवसाचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. तसेच हरकत न कळवीता परस्पर वर्तमान पत्रातून जाहीर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
दिनांक –२१/१०/२०२६

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील, **मौजे टि पी स्किम नंबर ३** येथील खालील वर्णनाची मिळकत

| फायनल प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|
| **४१/२१** | **२०००.९५ चौ.मी** |

**यापैकी क्षेत्र ३९५.९१ चौ.मी.**
**यासी चतुःसीमा**
पुर्वेस :– श्री. मल्हारी रासकर यांची मिळकत
दक्षिणेस :– फायनल प्लॉट नंबर ४१/२१ पैकी उर्वरित क्षेत्र
पश्चिमेस :– धूत यांची मिळकत
उत्तरेस :– हॉटेल पर्वत व जाण्या–येण्याचा रस्ता
सदर मिळकतीचे विद्यमान मालक–डॉ. महेश मनोहर वीर, रा. मार्केटयार्ड, अहिल्यानगर

**अॅड. प्रणव सुधीर धर्माधिकारी, अॅड. सौ.नुतन प्रणव धर्माधिकारी**
मो.नं.९०२८००८२००, पत्ता – भंडारी सावज अपार्टमेंट,
कोठीरोड, अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली फ्लॅट मिळकत ही विद्यमान मालक **मिना गणेश तनपुरे रा. सावेडी, अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे. सदर फ्लॅट मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या फ्लॅट मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून आमच्या आशिलाकडून विद्यमान मालक यांनी विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर फ्लॅट मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचाही तक्रार राहु नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकतबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर फ्लॅट मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :–** डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे सावेडी येथील टि.पी. स्किम नं. ४ मधील फायनल प्लॉट नं. १०९ मधील सब प्लॉट नंबर ११, १४ व १५ याचे एकूण क्षेत्र ४९४.७५ चौ. मी. यांवर बांधकाम केलेल्या "गायत्री अपार्टमेंट" या अपार्टमेंट मधील फर्स्ट फ्लोअर वरील फ्लॅट नं. १०१ याचे एकूण क्षेत्र ४१.६४१ चौ. मी. ही संपूर्ण फ्लॅट मिळकत.**
**यांसी चतुःसिमा**
पुर्व :– फ्लॅट नं. ००३, दक्षिण :– फ्लॅट नं. १०२,
पश्चिम :– ओपन टु स्काय, उत्तर :– ओपन टु स्काय,
अहिल्यानगर दिनांक :–२१/१०/२०२६
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

**अॅड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**अॅड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस– फ्लॅट नं. ४, गुरुप्रसाद अपार्टमेंट
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

# सकल राजस्थानी युवा मंचच्या अध्यक्षपदी राजेश गुगळे यांची निवड



नगर – सकल राजस्थानी युवा मंचच्या अध्यक्षपदी राजेश गुगळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. राजेश गुगळे हे मंचचे संस्थापक सदस्य असून, त्यांनी दीर्घकाळापासून समाजकार्यात सक्रिय सहभाग नोंदवला आहे. यापूर्वी त्यांनी तीन विविध सामाजिक संस्थांमध्ये अध्यक्षपदाची धुरा सांभाळली आहे.

# एम.डी.एस. परीक्षेत डॉ. विनिता कोठारी उत्तीर्ण

श्रीरामपूर – येथील जैन समाजातील दंतरोग तज्ञ डॉ. विनीता



उर्फ अक्षदा राहुल कोठारी ही एम.डी.एस. (पेरिओडॉन्टोलॉजी आणि ओरल इम्प्लांटोलॉजी) परिक्षामध्ये महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे.

विनीता कोठारी हिने धुळे येथील अण्णासाहेब पाटील मेमोरीयल डेंटल कॉलेज मधुन एम. डी. एस. पदवीचे शिक्षण घेतले असुन तिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सेंट झेवियर स्कुल व ११ वी व १२ वी बोरावके महाविद्यालय श्रीरामपूर येथे तर बी.डी.एस. परीक्षा संगमनेरच्या सौ. मथुराबाई भाऊसाहेब थोरात महाविद्यालयातुन उत्तीर्ण झाली आहे. परिक्षेनंतर शासकिय डेंटल महाविद्यालयात मुंबई येथे प्रशिक्षण पुर्ण केले. त्यानंतर एम. डी. एस. परिक्षेसाठी धुळे येथे प्रवेश घेतला. ती परिक्षेत कॉलेजमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. विनिता हिला या यशासाठी डेंटल महाविद्यालय धुळेचे प्राचार्य डॉ. अरुण डोडामणी, प्रा. डॉ. अनुराधा भटसंगे व डॉ. अलका वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

विनीता हि ज्येष्ठ पत्रकार रमेश कोठारी व सौ. प्रमिला कोठारी यांची नात व श्रीरामपूर मर्चंट असोसिएशनचे माजी अध्यक्ष राहुल कोठारी व जैन धर्माच्या स्वाध्यायी सौ. लिना कोठारी यांची कन्या तर सी. ए. युवराज कोठारी यांची भगिनी आहे. धुळे येथील व्यापारी भागचंद सेमलाणी यांची नात आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडुन विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्राचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता.२१/१०/२०२६.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**
जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, मौजे शहर अहिल्यानगर येथील खालील वर्णनाची जागेसह बांधकाम केलेली मिळकत –
**अ) सिटी सर्व्हे नंबर २१५ याचा म्यु.घर नं.५४२ चे एकुण क्षेत्रफळ १०१.२० चौ.मीटर**
**यांसी चतुःसिमा**
पुर्वेस :– रस्ता दक्षिणेस :– सिटी सर्व्हे नं.२१४
पश्चिमेस :– सिटी सर्व्हे नं.२१६ उत्तरेस :– बोळ
**ब) सिटी सर्व्हे नंबर २१६ याचा म्यु.घर नं.५४६ चे एकुण क्षेत्रफळ २२७.४० चौ.मीटर**
**यांसी चतुःसिमा**
पुर्वेस. :– सिटी सर्व्हे नं.२१५ दक्षिणेस :– सिटी सर्व्हे नं.२१३
पश्चिमेस :– सिटी सर्व्हे नं २१७ व २१८ उत्तरेस :– बोळ
**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक –**
**प्रसन्ना सुर्यकांत सुराणा,** रा.२, प्रणव प्लाझा, औरंगपुरा, भाजी मंडई समोर, संभाजीनगर, छत्रपती संभाजीनगर.

**अॅड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर. मो. नं. ९०११६७८९९९, ९८६०८०५५५९

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की,खालील परिशिष्टात नमुद केलेली जमीन मिळकत विद्यमान मालक **सौ.रिजवाना जाकीर शेख, रा.स.नं.३२१/१ प्लॉट नं–५ फैसल मंजील, मुकुंदनगर,अहिल्यानगर** यांचे खरेदी मालकीची वहिवाटीची असुन ७/१२ व इतर महसुली रेकॉर्डला त्यांचे नांवे दाखल आहे. त्यांनी सदर जमीन मिळकत विक्री करण्याचा करार आमचे अशिलांबरोबर केलेला आहे आणि सदर जमीन मिळकत कायमखुष खरेदी देण्याचे ठरविले आहे.तसेच व्यवहारापोटी विसार म्हणुन आमचे अशिलाकडुन रक्कम देखील घेतलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत असल्याचा विश्वास व भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीनीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा,लिज,गहाण, दान, बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस,वित्तीय संस्था व इतर कोणाचेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनीही नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत व तक्रार न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकत खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मग कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत अथवा तक्रार चालणार नाही. असे काही हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक ते सोडुन दिले आहेत असे समझण्यात येईल.

**परिशिष्ट**
जिल्हा तुकडी अहिल्यानगर पोट तुकडी तालुका नगर जिल्हा अहिल्यानगर पैकी जिल्हापरिषद हद्दीतील मौजे निमगांव वाघा येथील शेतजमीनीचे वर्णन पुढीलप्रमाणे–

| गट नं. | हे.आर | आकार |
|---|---|---|
| ४३६/१ | २.१८ | ३.०७ |
| | ख. ०.२० | |
| | २.३८ | |

यापैकी विद्यमान मालक यांचे हिश्याची संपूर्ण पुर्वबाजुची ० हे ११ आर जमीन खरेदी देण्याचे ठरलेले आहे. याच क्षेत्रामध्ये एक बोअर असुन तो व त्याचे पाणी स्वतंत्र मालकीचा तसेच त्यातील मोटर, लाईट मीटरसह
यांसी चतु:सिमा–
पुर्वेस – गट नं.४३६/१ पैकी जमीन दक्षिणेस – नगर–कल्याण रस्ता
पश्चिमेस – गट नं.४३६/१ पैकी ० हे ११ आर जमीन
उत्तरेस – कच्चा गाडी रस्ता
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक संपुर्ण जमीन काही एक हक्क राखुन न ठेविता.
दिनांक– २१/१०/२०२६, अहिल्यानगर

**अॅड.नासीर मोहमंद खान**
ऑफिस पत्ता– बी–१, सुर्या कॉम्प्लेक्स हातमपुरा,
अहिल्यानगर ४१४००१ मो. ९८८१२३६७८३

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# भारत पृथ्वीवर आणणार 'सूर्य'

विज्ञान क्षेत्रात जगभरातील देशाने भरीव कामगिरी केली आहे. विज्ञानाच्या जोरावर मानवाने आकाशाला गवसणी घातली आहे. भारत आता विज्ञानाच्या क्षेत्रात आणखी एक पाऊल पुढे टाकत आहे. भारत आता कृत्रिम सूर्य बनवणार आहे. गुजरातच्या स्टार्टअप कंपनी 'प्रानोस फ्युजन'ने आपल्या 'प्रज्ञा' या कॉम्पॅक्ट टोकामाक रिक्टरमध्ये प्रथमच प्लाझ्माची निर्मिती केली आहे. त्यामुळे भारताने पृथ्वीवर कृत्रिम सूर्य तयार करण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल टाकले आहे.

कंपनीने ४० सेंटिमीटर व्यासाचा गायरोट्रॉन आठ महिन्यांत विकसित केला आहे. याचा उपयोग प्लाझ्मा नियंत्रित करण्यासाठी, त्याचे परीक्षण करण्यासाठी आणि 'न्यूक्लियर फ्युजन' तयार करण्यासाठी केला जणार आहे. सध्या दरवर्षी अंदाजे तीन हजार प्लाझ्मा शॉट्स घेण्याचे उद्दिष्ट आहे, म्हणजेच दररोज १० ते १२ वेळा प्लाझ्मा तयार केला




जाईल आणि संबंधित माहिती गोळा केली जाईल. या माहितीचा उपयोग भविष्यात मोठे 'फ्युजन रिक्टर्स' विकसित करण्यासाठी केला जाऊ शकतो आणि यातून १३० मेगावॅट वीजनिर्मिती केली जाऊ शकते. तसेच प्लाझ्माचे तापमान २० कोटी अंश सेल्सिअसपेक्षा जास्त उष्ण असून, ते सूर्यापेक्षाही अधिक उष्ण आहे. कंपनीने विकसित केलेले 'टोकामाक' हे एक असे यंत्र आहे, ज्यामध्ये अत्यंत उष्ण प्लाझ्मा चुंबकीय शक्तीद्वारे नियंत्रित केला जातो. 'फ्युजन' प्रक्रियेसाठी, वायूला इतक्या उच्च तापमानापर्यंत गरम केले जाते की, त्याचे प्लाझ्मामध्ये रूपांतर होते.

# कॅलिडोस्कोप

# भारतात होते डायनॉसॉरचे अस्तित्व

भारताच्या इतिहासात डोकावलं असता काही वैभवसंपन्न गोष्टी नजरेसमोर येतात आणि अनेकांच्या भुवया उंचावतात. याच भारतात डायनॉसॉरचं अस्तित्व होतं असं कोणी सांगितलं तर विश्वास बसणार नाही, मात्र हे सत्य आहे. आतापर्यंत 'ज्युरासिक पार्क' नावाच्या चित्रपटाच्या सीरिजमुळे डायनॉसॉरसारख्या महाकाय प्राण्याच्या अस्तित्वाविषयी अनेकांना माहिती मिळाली. अर्थात चित्रपटाच्या आधीपासून विविध संदर्भांमध्ये लिखित स्वरुपातही डायनॉसॉरची माहिती उपलब्ध आहे, हे नाकारता येत नाही; पण भारतात नुकत्याच झालेल्या संशोधनातून ही असामान्य बाब समोर आली आहे. भारतीय संशोधकांना साधारण मगर- डायनॉसॉरसारख्या आकाराच्या प्राण्याचे अवशेष सापडले आहेत. ज्युरासिक काळातील हे अवशेष राजस्थानच्या जैसलमैरमधील निर्मनुष्य भागात सापडले असून या संशोधनामुळे राजस्थानमधील या भागाबाबतची चर्चा एकाएकी वाढली आहे. संशोधकांच्या माहितीनुसार उत्खननातून समोर आलेले हे अवशेष फायटॉसॉरचे असून ते साधारण १.५ ते २ मीटर इतक्या आकाराचे आहेत. साधारण २०० मिलियन वर्षांपूर्वीचे हे अवशेष ज्युरासिक कालखंडाच्या सुरुवातीचे अवशेष असल्याची माहिती आहे. सेमी ॲक्वॅटिक रेप्टाईल्स या श्रेणीत या प्राण्याची गणती होत असून, सध्याच्या मगरीचे ते पूर्वज असल्याचं म्हटलं जातं.

जैसलम



`रच्या मेघा गावातील एका पुरातन ठिकाणी हे अवशेष सापडले. तिथे असणाऱ्या या भौगोलिक रचना पाहता डायनासोरच्या कालखंडामध्ये इथे जीवसृष्टी अस्तित्वात असल्याचा दावा संशोधकांनी केला आहे. या संशोधनाचं नेतृत्वं डॉ. नारायणदास इन्खिया यांनी राजस्थानच्या पाणी खात्याशी समन्वय साधत केलं.

संशोधकांच्या मते या भागात अशी आणखी अनेक रहस्य दडलेली असू शकतात, जी समोर आणणं आव्हानात्मक काम आहे. दरम्यान, प्राथमिक स्वरुपात या अवशेषांची माहिती एका तलावाच्या उत्खननावेळी स्थानिक गावकऱ्यांना मिळाली. मातीत खोदकाम करत असताना सापळ्यासम काही अवशेष दिसताच त्यांनी यासंदर्भातील माहिती संबंधित शासकीय विभागाला दिली. त्यानंतर आणखी खोदकाम केलं असता तिथे फायटॉसॉरचे अवशेष आणि कैक वर्षांपासून तिथंच राहिलेली या प्राण्याची जीवाश्म रुपातील अंडीसुद्धा सापडली. त्यामुळे इथे हा जीव नदीकाळी कैक वर्षांपूर्वी बऱ्याच काळासाठी वास्तव्यास असल्याच्या प्राथमिक निष्कर्षावर संशोधक सध्या पोहोचले आहेत.



# पंतप्रधान नरेंद्र मोदी 'स्वातंत्र्यसैनिक'?

भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांसंदर्भातील धड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावाच्या उल्लेख एका खासगी कोचिंग क्लासने केला आहे. या क्लासने छापलेल्या पुस्तकामध्ये मोदी यांचा उल्लेख महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, रवींद्रनाथ टागोर आणि मंगल पांडे यांसारख्या स्वातंत्र्यसैनिकांसोबत करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, पंतप्रधान मोदींचा जन्म १७ सप्टेंबर १९५०मध्ये म्हणजेच भारताला ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तीन वर्षांनी झाला आहे. २०१४ साली पंतप्रधानपदाची शपथ घेतलेले मोदी हे स्वतंत्र भारतात जन्मलेले देशाचे पहिले पंतप्रधान ठरले होते. खासगी क्लासने छापलेल्या या पुस्तकामध्ये मोदींनी पंतप्रधान झाल्यापासून वेगवेगळ्या निमित्ताने केलेली वेगवेगळ्या विधानांचाही उल्लेख आहे. 'मैं भी चौकीदार', 'जय जवान जय किसान जय विज्ञान जय अनुसंधान' यांसारखी वाक्ये मोदी यांनी पहिल्यांदा देशाला दिल्याचा उल्लेख यात आहे. स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या 'शिवांत सर' नावाच्या व्यक्तीने 'सोशल मीडिया'वर शेअर केलेला हा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. अनेकांनी अशा पुस्तकांमुळे मुलांपर्यंत खरी माहिती पोहोचणारच नाही, अशी भीती व्यक्त केली आहे.

# सोन्याची नाणी मजुरांनी केली जमा

अनेकदा जुन्या वाड्यात किंवा पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत असलेल्या ऐतिहासिक वास्तूंमध्ये खोदकाम करताना किंवा त्यांची नव्याने पायाभरणी करताना मौल्यवान वस्तू आढळल्याच्या घटना यापूर्वी समोर आल्या आहेत. काहीवेळा, सोन्याची नाणी किंवा सोन्याचा हंडा अशाही मौल्यवान वस्तू आढळल्या आहेत; मात्र आता चक्क १५व्या शतकातील सोन्याची नाणी आढळून आली आहेत. 'व्ही.बी.जी. राम योजने'अंतर्गत बेळगाव जिल्ह्यात सुरू असलेल्या कामाच्यावेळी माती खणत असताना कामगारांना सोन्याची १४ प्राचीन नाणी सापडली. विशेष म्हणजे, या नाण्यांवर हत्तीचे चित्र असून, ही नाणी १०व्या ते १५व्या शतकातील असण्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

सोने म्हटले की, भल्याभल्यांना मोह सुटतो. कित्येकदा सोने चोरी, चेन स्नॅचिंगसारख्या घटना घडत आहेत. सोन्याच्या दागिन्यांसाठी जीवघेणा हल्ला झाल्याच्याही घटना समोर आल्या आहेत; मात्र रोजंदारीवर काम करणाऱ्या गरीब मजुरांना या सोन्याचा कसलाही मोह नसल्याचे दिसून आले. कारण सापडलेली सोन्याची नाणी त्यांनी प्रामाणिकपणे ग्रामपंचायतीकडे जमा केली. बेळगाव जिल्ह्याच्या बैलहोंगल तालुक्यातील इंचल गावात खोदकाम सुरू असतानाएका मडक्यात सोन्याची १४ नाणी सापडली आहेत. ही नाणी मजुरांनी स्वतःकडे न ठेवता, ती तातडीने ग्रामपंचायत कार्यालयात जमा केली. इंचल येथील बीसीएम वसतिगृहाजवळ व्ही.बी.जी. रामजी योजनेअंतर्गत खोदकाम सुरू होते. काम करत असताना मजुरांना एक मडके सापडले आणि त्या मडक्यात तब्बल १४ सोन्याची नाणी आढळून आली आहेत. कामगारांनी ही नाणी प्रामाणिकपणे ग्रामपंचायत कार्यालयाकडे जमा केली. त्यानंतर ही नाणी तहसीलदारांकडे सुपूर्द करण्यात आली आहेत.

मडक्यातील या सोन्याच्या नाण्यांवर आढळलेल्या हत्तीच्या चित्रावरून या नाण्यांचा संबंध पश्चिम गंगाच्या तळकाड राजवटीशी किंवा विजयनगर साम्राज्याच्या काळाशी असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही नाण्यांच्या दर्शनी भागावर अलंकारयुक्त हत्तीचे चित्र दिसून येते. पश्चिम गंगा राजवटीच्या राजचिन्हाशी संबंधित हत्तीच्या प्रतिमेमुळे या नाण्यांना ऐतिहासिक महत्त्व असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.





# सॅलामँडरची अजब दुनिया

या पृथ्वीतलावर असंख्य सजीव आहेत. प्रत्येक सजीवाचं एक वैशिष्ट्य आहे. काही सजीव पाण्याशिवाय बराच काळ जिवंत राहू शकतात तर काहींना अन्नाशिवायही दिवस काढता येतात. असाच एक सजीव काही न खाता बराच काळ जिवंत राहू शकतो. सॅलामँडर असं या सजीवाचं नाव. हा जीव बोस्निया आणि हर्जेगोविना इथल्या गुहांमध्ये सापडला आहे. गेल्या सात वर्षांपासून हा सॅलामँडर जागेवरून हललेला नाही. सॅलामँडर जवळपास १०० वर्षे जगतो. आपल्या जीवनातला बराच काळ तो पाण्यात घालवतो. स्लोवेनियापासून क्रोएशियापर्यंतच्या प्रदेशात हे प्राणी आढळतात. सॅलामँडर साधारण १२ वर्षांनंतर आपली जागा बदलतात. जोडीदाराच्या शोधासाठी त्याला हालचाल करावी लागते. दुर्गम भागातल्या गुहांमध्ये राहणाऱ्या सॅलामँडरना अन्न मिळतंच असं नाही. त्यामुळे ते बराच काळपर्यंत अन्नाशिवाय राहू शकतात. अशा या सॅलामँडरची दुनिया अजबच म्हटली पाहिजे.

# चुगल्या करून कमावते लाखो रुपये!

इतरांच्या घरातील घडामोडी जाणून घेण्याची उत्सुकता अनेकांना असते. शेजारच्या घरात काय सुरू आहे, कोणाचे कोणाशी पटत नाही किंवा परिसरात कोणती चर्चा सुरू आहे, याची माहिती मिळवण्यासाठी काहीजण नेहमी उत्सुक असतात; मात्र एका ६७ वर्षीय महिलेने याच सवयीला चक्क व्यवसायाचे रूप दिले आहे. त्यांच्या या अनोख्या कामाची सध्या 'सोशल मीडिया'वर चांगलीच चर्चा होत आहे. या कोलंबियन महिलेने तिच्या या व्यवसायाविषयी सांगताच भारतातील अनेकजणांना आश्चर्याचा धक्काच बसला आहे.



'गल्फ टुडे'च्या रिपोर्टनुसार, कोलंबियातील आर्मेनिया शहरात राहणारी मिरियम ही महिला दररोज घराबाहेर खुर्ची टाकून बसते. परिसरात सुरू असलेल्या छोट्या-मोठ्या घडामोडी त्यांच्या नजरेतून सुटत नाहीत. कोणाच्या घरात काय सुरू आहे, कोणाचे भांडण झाले किंवा कोण कोणाला भेटत आहे, याची माहिती त्या लक्षात ठेवतात. त्यांच्या निरीक्षणामुळे परिसरातील अनेक गुपितांची माहिती त्यांच्याकडे जमा होते. मिरियम यांनी आपल्या या सवयीला व्यवसायाचे स्वरूप दिले आहे. त्या स्वतःला 'प्रोफेशनल चिस्मोसा' म्हणजेच 'गॉसिप क्वीन' म्हणतात. एखाद्या शेजाऱ्याबद्दल माहिती हवी असल्यास लोक त्यांच्याकडे येतात. छोट्या बातमीसाठी त्या पाच हजार ते दहा हजार कोलंबियन पेसो आकारतात, तर मोठ्या गुपिताची किंमत अधिक असते. त्यामुळे साध्या गॉसिपमधूनही त्यांना चांगली कमाई होते. मिरियम यांनी सांगितले, एका व्यक्तीचे पत्नी बाहेर गेल्यानंतर दुसऱ्या महिलेसोबत संबंध असल्याचे गुपित त्यांनी जपले होते.

हे गुपित लपवण्यासाठी त्या व्यक्तीकडून त्यांनी सात लाख कोलंबियन रुपये घेतले होते. या प्रकारातून त्यांच्या व्यवसायाची अनोखी पद्धत समोर येते. मिरियम प्रत्येक माहितीची तारीख आणि वेळेसह नोटबुकमध्ये नोंद करतात. त्यांच्या घरात गॉसिप बोर्डही आहे, ज्यावर फोटो, कागद आणि धाग्यांच्या मदतीने माहिती जोडलेली असते. त्यांच्या या कामामुळे काही शेजारी नाराज असले, तरी परिसरातील लोकांची उत्सुकता त्यांना पुन्हा मिरियम यांच्या दारापर्यंत घेऊन येते.

# सगळेच कुंभकर्ण!

बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकांना निद्रानाशाचा त्रास होऊ लागला आहे. अपुऱ्या झोपेमुळे बराच त्रास होऊ शकतो. मात्र काही लोक कधीही झोपून जातात. त्यांना उभ्या उभ्याही झोप येते. काहीजण बोलता बोलता किंवा चालता चालता झोपून जातात. आता बोलता बोलता झोप लागू शकते पण चालताना कशी बरं झोप येईल? कझाकिस्तानमधल्या कलाची गावामधले लोक कधीही झोपतात. विशेष म्हणजे त्यांच्या झोपेचं गुपित अजूनही उघड झालेलं नाही. इथले लोक एकदा झोपल्यावर काही महिने उठतच नाहीत.



झोपून उठल्यानंतर त्यांच्या काहीच लक्षात रहात नाही. तसंच ते काही तरी असंबद्ध बोलत राहतात. कलाची गावचं हे प्रकरण २०१० मध्ये समोर आलं होतं. त्यावेळी शाळेत गेलेली काही मुलं अचानक झोपी गेली. त्यानंतर बराच काळ ती उठलीच नाहीत. त्यानंतर अशा प्रकारे झोपणाऱ्यांची संख्या वाढत गेली. यानंतर शास्त्रज्ञांनी या भागात संशोधन सुरू केलं. मात्र नेमकं कारण सापडलं नाही. या भागात युरेनियमच्या खाणी आहेत. या खाणींमधून निघालेल्या वायूमुळे झोप येत असल्याचं स्थानिकांचं म्हणणं आहे. पण याला कोणताही शास्त्रीय आधार नाही. याच कारणामुळे इथले लोक दुसरीकडे स्थलांतरित होत आहेत.




# ढाब्याची वार्षिक उलाढाल १०० कोटी!

भारतात अनेक महागडी आणि पंचतारांकित हॉटेल्स आहेत. त्यांची कमाई थक्क करणारी आहे. भारतातील महागड्या हॉटेल्सना भारतातील सर्वांत श्रीमंत ढाबा टक्कर देत आहे. भारतात एक असा ढाबा आहे, त्याच्या एका दिवसाच्या कमाईत १० नवीन हॉटेल्स सुरू करता येतील. एखाद्या लोकप्रिय हॉटेलमध्ये ५०० लोक जेवायला येतात; मात्र या ढाब्यावर ५०० लोक कामाला येतात. यावरून अदांज लावू शकता, रोज येथे किती ग्राहक येत असतील!

'अमरिक सुखदेव ढाबा' असे भारतातील सर्वांत श्रीमंत ढाब्याचे नाव आहे. हरयाणातील मुरथल येथे हा प्रसिद्ध ढाबा आहे. दिल्ली-एनसीआरपासून केवळ तीन तासांच्या अंतरावर हा ढाबा आहे. या ढाब्यावर २४ तास ग्राहकांची गर्दी असते. येथे५००हून अधिक कर्मचारी काम करतात. 'अमरिक सुखदेव ढाब्य'ाची सुरुवात रस्त्याच्या कडेला असलेल्या एका छोट्या ढाब्यापासून झाली होती. अमरिक सुखदेव यांच्या ढाब्याला दररोज पाच हजार ते दहा हजार ग्राहक भेट देतात. विशेष म्हणजे, कधीही या ढाब्याची जाहिरात करण्यात आली नाही, तरीही तो प्रसिद्ध झाला आहे. १९५६ मध्ये सरदार प्रकाश सिंग यांनी मुरथल येथील जीटी रोडवर एक ढाबा सुरू केला. तेव्हा हा ढावा म्हणजे एक ताडपत्रीचा तंबू आणि लाकडी खांब होते. महामार्गावरून प्रवास करणाऱ्या ट्रकचालकांसाठी हा ढाबा सुरू करण्यात आला होता. जेवण्यासाठी ते अशा ढाब्यांवर थांबत असत. त्यावेळी त्यांना आराम करता यावा म्हणून ढाब्यावर खाटाही ठेवण्यात आल्या होत्या. नंतर सरदार प्रकाश सिंग यांचे पुत्र अमरिक सिंग आणि सुखदेव सिंग यांनी तो ढाबा ताब्यात घेतला. त्यांनी आपली नावे एकत्र करून ढाब्याला 'अमरिक सुखदेव ढाबा' असे नाव दिले. सुरुवातीला ढाब्यावर फक्त डाळ-रोटी, भाजी आणि भात मिळत असे. लोक खाटांवर आरामात बसून जेवत असत. अनेक कंटेट क्रिएटर्सनी या ढाब्याला भेट दिली आहे. कधीही या ढाब्याला भेट दिली, तरी येथील १५० टेबलावंर ६०० लोक जेवताना दिसतील. प्रत्येक टेबलसाठी अंदाजे ४५ मिनिटांचा वेळ लागतो आणि दिवसातून १५ वेळा टेबल रिकामे होऊन पुन्हा भरले जातात. या ढाब्यावर दिवसभरात अंदाजे नऊ ते दहा हजार लोक जेवणाचा आस्वाद घेतात. रेस्टॉरंटच्या मालकाचे कुटुंब दररोज तयार होणाऱ्या जेवणाची स्वतः चव घेते. जेवण केवळ उत्कृष्ट दर्जाचेच नाही, तर त्याची चवही सातत्यपूर्ण राहील याची ते खात्री करतात. 'टेस्ट टलस'च्या जगातील १०० सर्वांत प्रतिष्ठित रेस्टॉरंट्स'च्या यादीत याचा समावेश झाला होता.

# टीव्हीवरची पहिली जाहिरात...

आज आपण दूरदर्शन आणि इतर माध्यमांवर अनेक प्रकारच्या जाहिराती पाहतो; पण भारतातील पहिली टेलिव्हिजन जाहिरात कोणती होती आणि ती कधी प्रसारित झाली, याची माहिती फारच थोड्या लोकांना असेल. आजकाल टीव्हीची जागा इंटरनेटवरील सेवांनी घेतली आहे, पण जाहिरातींचे महत्त्व आजही कायम आहे. भारतात टीव्हीवरील पहिली जाहिरात १ जानेवारी १९७६ रोजी प्रसारित झाली होती. ही जाहिरात ग्वाल्हेर शूटिंग अँड फॅब्रिक्स या कपड्यांच्या कंपनीची होती. या जाहिरातीनंतर भारतीय प्रसारमाध्यमांमध्ये जाहिरातींचे युग सुरू झाले. या जाहिरातींचा उद्देश केवळ वस्तू विकणे नसून, लोकांच्या जीवनशैलीत बदल घडवून आणणे हा होता. तेव्हापासून जाहिरातींची मागणी वाढतच गेली आणि ती प्रसारमाध्यमांसाठी उत्पन्नाचे एक मोठे साधन बनली.

जाहिराती बनवण्यामागे मुख्य कारण म्हणजे ग्राहकांमध्ये उत्पादनाबद्दल जागरूकता निर्माण करणे. वेगवेगळ्या माध्यमांद्वारे जाहिराती प्रसारित केल्या जातात. यामुळे लोकांना वस्तू आणि सेवांबद्दल माहिती मिळते. तसेच, ज्या माध्यमावर जाहिरात प्रसारित होते, त्या संस्थेला त्यातून उत्पन्न मिळते.



जाहिरात कंपन्या आपल्या उत्पादनाच्या प्रसिद्धीसाठी पैसे देतात आणि त्यातून घरोघरी त्यांच्या वस्तूंची माहिती पोहोचवतात.

भारतात रंगीत टीव्हीची सुरुवात १९८२ मध्ये झाली. टीव्हीवर आशियाई खेळांचे प्रक्षेपण सुरू झाल्यावर भारतीय टेलिव्हिजनमध्ये मोठी क्रांती झाली. टीव्हीचे रंगीत जग आल्यावर 'बुनियाद', 'नुक्कड़', 'रामायण' आणि 'महाभारत' यासारख्या कार्यक्रमांनी टीव्हीची लोकप्रियता शिखरावर पोहोचवली. या जाहिरातींनी सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांनाही चालना दिली.१९९० च्या दशकानंतर जाहिरातींचे स्वरूप बदलले. खासगी वाहिन्यांच्या आगमनाने जाहिरातींमध्ये स्पर्धा वाढली. त्यामुळे जाहिराती अधिक आकर्षक आणि व्यावसायिक झाल्या. आजही टीव्ही, इंटरनेट आणि सोशल मीडियावर जाहिरातींचा प्रभाव कायम आहे.

# नगरमध्ये १ नोव्हेंबरला माळी समाजाचा वधू-वर परिचय मेळावा

## माजी आमदार पांडुरंग अभंग यांना निमंत्रण, वधू-वर मेळाव्यासाठी आवाहन

नगर - अहिल्यानगर सकल माळी समाज संस्था आयोजित माळी वधू-वर परिचय मेळावा १ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते सायं.४ वा.बंधन लॉन्स, सावेडी, अहिल्यानगर येथे होणार आहे. या मेळाव्याचे निमंत्रण नेवासा-शेवगाव मतदार संघाचे माजी आमदार पांडुरंग अभंग यांना देण्यात आले.

यांप्रसंगी तरवडी येथील उत्तमराव पाटील, यशवंत (बंडु) पाटील, सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, कोअर कमिटीचे उद्योजक राजेंद्र ताठे, इंजि.चंद्रकांत पुंड, कॅप्टन सुधीर पुंड, विश्वस्त अनिल इवळे, सचिव अमोल भांबरकर, शुभम ताठे आदी उपस्थित होते.

या मेळाव्याचे उद्घाटक म्हणून इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार योगेश टिळेकर (प्रदेशाध्यक्ष, भाजप ओबीसी मोर्चा) हे उपस्थित राहणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून उपमहापौर धनंजय जाधव हे असून कार्यक्रमाचे अध्यक्ष किशोर डागवाले व आयोजक बाळासाहेब भुजबळ हे आहेत.



अहिल्यानगर सकल माळी समाज संस्था आयोजित माळी वधू-वर परिचय मेळावा अहिल्यानगर येथे होणार आहे. या मेळाव्याचे निमंत्रण नेवासा-शेवगाव मतदार संघाचे माजी आमदार पांडुरंग अभंग यांना देण्यात आले.

यावेळी माजी आमदार पांडुरंग अभंग म्हणाले, सर्वप्रथम मी सकल माळी समाज संस्थेचे मनापासून अभिनंदन करतो. आज काळाची गरज ओळखून तुम्ही जो वधू-वर परिचय मेळावा आयोजित केला आहे, हा अत्यंत स्तुत्य आणि समाजाला दिशा देणारा उपक्रम आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात आपल्या मुला-मुलींसाठी योग्य जोडीदार शोधणे हे पालकांसमोर मोठे आव्हान झाले आहे. या मेळाव्याला समाजाने मोठी उपस्थिती दाखवावी. लग्न जमविणे हा समाजाचा मोठा प्रश्न आहे. वधू-वर मेळावा घेऊन अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेने समाजाचा प्रश्न सोडविण्यासाठी वधूवर परीचय मेळाव्याचे आहे, ही कौतुकास्पद बाब आहे, असे मत पांडुरंग अभंग यांनी व्यक्त केले.

# अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या बिनविरोध निवडीचा फुगा अखेर फुटला

(पान १ वरुन)

दरम्यान, ज्या काही जागांबाबत तिढा आहे. त्यावर चर्चा करून पालकमंत्री राधाकृष्ण विखे आज दुपारी १२ वाजता बँकेच्या नवनिर्वाचित २१ संचालकांची नावे जाहीर करतील. त्यानंतर ज्यांची नावे या यादीत नाही त्यांनी तातडीने आपली उमेदवारी दुपारी ३ वाजेपर्यंत मागे द्यावी, असे आवाहन विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी काल पत्रकार परिषदेत केले होते. परंतु पारनेरसह काही जागांवर तोडगा न झाल्याने अखेर निवडणूक निश्चित झाली. शिंदे यांनीच आज दुपारी त्यांच्या चार जागा जाहीर केल्या. यात कर्जत सेवा सोसायटी मतदारसंघातून ज्योती प्रकाश शिंदे, जामखेड सेवा सोसायटी मतदारसंघातून सचिन नवनाथ घुमरे, महिला राखीव मतदारसंघातून मंजुषा राजेंद्र गुंड व इतर मागासप्रवर्गातून अजीनाथ रामभाऊ हजारे या चौघांची उमेदवारी जाहीर केल्याने राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली. शिंदे विखे-थोरात सहमती एक्सप्रेससोबत राहणार, खा.लंकेंसोबत जाणार की सवतासुभा उभारणार हे उशिरापर्यंत कळू शकले नव्हते. सायंकाळी उशिरापर्यंत दोन्ही पॅनलच्या अधिकृत उमेदवारांच्या याद्या प्रसिध्द झालेल्या नव्हत्या.



जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी अर्ज माघारी घेण्याच्या आज शेवटच्या दिवशी झालेली गर्दी (छायाचित्र : लहू दळवी)

दरम्यान, जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी नगरच्या शासकीय विश्रामगृहावर विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत २० ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठकीत वेगवान घडामोडी घडत जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते, लोकप्रतिनिधी, आमदार यांनी एकत्र येत दुष्काळी परिस्थितीमुळे बँकेची निवडणूक बिनविरोध करणे हिताचे असल्याचे सांगत ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी जिल्ह्यातील नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी केली होती.

यावेळी खा. नीलेश लंके, माजीमंत्री शंकरराव गडाख, आ. आशुतोष काळे, आ. मोनिका राजळे, आ. किरण लहामटे, आ. विक्रम पाचपुते, आ. हेमंत ओगले, आ. विवेक कोल्हे, आ. प्राजक्त तनपुरे, आ. संग्राम जगताप, आ. काशिनाथ दाते, माजी खासदार डॉ. सुजय विखे, माजी आमदार वैभव पिचड, बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम गायकर, माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले, माजी संचालक भानुदास मुरकुटे, करण ससाणे, राजेंद्र नागवडे, अंबादास पिसाळ, प्रताप ढाकणे, अमित भांगरे यांच्यासह बँकेसाठी इच्छुक असणारे तालुका पातळीवरील नेते उपस्थित होते.

यावेळी सुरूवातीला जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते समोरासमोर एकत्र बसत जिल्हा बँक निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी चर्चा झाली. या चर्चेच्यावेळी काही नेत्यांकडून तालुकानिहाय इच्छुकांचे म्हणणे एकून घेण्याची विनंती करण्यात आली. ही विनंती विखे, थोरात आणि शिंदे यांनी मान्य करत तालुकानिहाय सर्वांची मते जाणून घेतली. या बैठकीनंतर सभापती शिंदे, मंत्री विखे व थोरात यांनी तालुकानिहाय नेते व इच्छुकांबरोबर चर्चा केली. त्यावेळी सोसायटी मतदारसंघ किंवा राखीव सात जागा यापैकी एक जागेवर संधी देण्यात येईल. त्या दृष्टीने तालुकास्तरीय नेते व इच्छुकांनी चर्चा करून सांगा. यावेळी काही तालुक्याच्या नेत्यांनी उमेदवार निश्चितीचे अधिकार मंत्री विखे व थोरात यांना दिले होते.



# गुरुवाणी - ८६

## विनयशीलता...

तीर्थंकर भगवान महावीर स्वामी मोक्षप्राप्ती आधी मौनात नाही गेले. प्रभूंनी अंतिम समयी समवशरणमध्ये अखेरच्या ४८ तासात अंतिम देसना दिली. प्रभुंनी ५६ कथा सांगितल्या. त्यांनी ५६ व्यक्तींचे चरित्र ऐकवले, ज्यांनी जाणते अजाणतेपणी पाप केले, पण तीर्थंकरांची कृपा झाली आणि ते पाप मुक्तीच्या मार्गावर चालत मोक्षात गेले. प्रभुंनी सर्व कल्याणकारी देसना दिली. तीच सुधर्मा स्वामींनी जंबूस्वामींसमोर अमृतमय शब्दांत

विस्तारपूर्वक कथन केली. ती अनुभूती आपल्या सर्वांना व्हावी. प्रभूंनी सर्वात आधी, दुःखाचे मूळ कारण सांगितले, ते म्हणजे 'अविनय'. जो बाहेरच्या जगाशी डिस्कनेक्ट होतो, ज्याला दिव्य वरदान होण्याची आस असते तो विनयशील असतो. विनयाची पहिली व्याख्या, मी अहंकारात कोणतीही गोष्ट करणार नाही. ज्यांच्या चरणावर मी डोके टेकवतो, ते जी आज्ञा देतील तेच मी करेल. ज्याला गुरूचे सान्निध्य आवडते तो गुरूंचे अतर्मन जाणण्यास समर्थ होतो. ज्याला गुरूच्या भावना, आज्ञा, सहवास आवडत नाही, तो व्यक्ती मनाने रोगट असतो. विनय वरदान समृद्ध करायचे तर अनुशासन आवश्यक आहे. गुरूप्रती असलेला आदर भक्तीत रूपांतरीत झाला पाहिजे. गुरू म्हणजे आई वडील, सासू सासरे सगळेच आले. त्यांच्या प्रेमाची अनुभूती घेतली पाहिजे. आपल्या पेक्षा मोठ्यांमधील उणिवा, दोष शोधाल तर तुमच्यातील श्रद्धा समाप्त होईल. आपल्या मनाविरुद्ध गुरूंनी काही सांगितले तरी ते प्रेमानेच ग्रहण केले पाहिजे. असे काम कधीच करू नका, ज्यामुळे तुम्ही गुरू, मातापित्याचे शत्रू व्हाल, अगदी स्वप्नातही असे काम व्हायला नको. एक रहस्य आहे, जेव्हा वरदान मिळवायचे असते तेव्हा प्रणाम मुद्राच हवी. मोठे जेव्हा काही सांगतात तेव्हा ते उभे राहून प्रणाम मुद्रेत ग्रहण केले तर ते वरदान ठरेल. कधीही भोजनाची प्रशंसा नाही करायची. परमात्मा सांगतात, जो भोजन म्हणजे पदार्थाची प्रशंसा करतो, तो कधी आपल्या गुरूंची प्रशंसा करू शकत नाही. जो स्वादाची प्रशंसा करेल तो कधीच साधनेचा आस्वाद घेऊ शकत नाही. मोठे कधी रागावले तर त्यांना एकच गोष्ट हात जोडून सांगा, 'मी अशी गोष्ट पुन्हा करणार नाही. कोणतेही इतर स्पष्टीकरण देऊ नका. जिथे विनय हवा तिथे अविनय केला म्हणून जीवनात दुःख येते. मराठी एक वाक्य आहे, 'ज्याला डोके टेकवायला जागा नाही भेटली तो अभागी असतो. ज्याला डोके टेकवायला जागा भेटूनही डोके टेकवता आले नाही तो कपाळकरंटा असतो'.

- उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.



# गुरुवाणी - ८७

## मानवता भाव...

स्वतःशीच असलेली वचनबध्दता कधी तुटली नाही पाहिजे. साधना मार्गावर चालताना वेगळी परिस्थिती आली तर साधकाला ती नीट हाताळता येत नाही आणि आपण पुन्हा झिरो होतो. परिस्थिती पुण्यामुळे किंवा पापामुळे निर्माण होऊ शकते. पण तुमची बांधिलकी अतूट राहिली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत आपला निर्धारित रस्ता सोडायचा नाही. सुधर्मा स्वामींनी भगवान महावीरांचे एक महत्त्वाचे सूत्र सांगितले, की त्यांची नजर रस्त्यावरून कधीच हटली नाही. कधी आपल्या समोर असे भोजन येते की मन भरकटते, कधी समोर भोजन असूनही ते खावे वाटत नाही. साधकाने अशावेळी मर्यादा पालन केलेच पाहिजे. कशाचे तरी आकर्षण निर्माण होऊ शकते, भीती वाटू शकते. पण निश्चय ढळू द्यायचा नाही. मी लाचार, मजबुर मनाने नाही मजबूतीने चालेल. जे मजबूर नाही मजबूत असतात तेच छत्रपती शिवाजी महाराज होतात. आलेले कोणतेही संकट जाणारच असते, फक्त मन कमजोर होऊ द्यायचे नसते. मन मजबूत होण्यासाठी जीन शासन जे विजेत्यांचे शासन आहे तेवढेच ऐका. उपवास सुरू केल्यावर खाण्यासाठी मन व्याकुळ झाले तर त्याकडे पाहूच नका. अयशस्वी होण्यास बहाने हे मुख्य कारण असते. बहाने देणे बंद केले तर अपयश येऊच शकत नाही. मनात शंका ठेवून जगू नका. आपल्या मनाविरुद्ध कोणी वागत बोलत असेल तर त्याकडे साफ दुर्लक्ष करा. आज एखादी गोष्ट नाही मिळाली म्हणजे ती उद्याही मिळणार नाही असे नसते. विजेता होण्याचा मार्ग कधीच बंद होत नाही. जीवनाचे ध्येय श्रेष्ठतम बनने असले पाहिजे. 'मै रोते हुए जन्मा हू , रोते हुए मरूंगा नहीं.' यशस्वी झाल्यानंतर मनात फक्त मानवतेची भावना हवी. अनेकदा यश मिळाल्यानंतर व्यक्ती स्वतःला ग्रेट समजू लागतो. परमात्मा सांगतात, जर तुम्हाला श्रेष्ठतम व्हायचे तर तुमच्यातील मानवता भाव उच्चतम हवा. लोकसंख्या खूप वाढली आहे,पण मानवता किती लोकांमध्ये आहे? ज्याला अनोळखी व्यक्तीचे दुःख जाणवते तो मनुष्य असतो. त्यांच्यातच धर्म ऐकण्याची कला येते. धर्म हृदयात पोहोचला तरच श्रद्धा निर्माण होईल. शक्ती शून्य, उत्साह नसलेली भक्ती सफल होत नाही. ज्यात तुम्ही आनंद घेता तीच शक्ती जागृत होते. भक्तीत आनंदाची अनुभूती घ्याल तर भक्तीच जागृत होईल. तीर्थंकरांचा आत्मा मोक्षात जातो पण तीर्थंकर नाम कर्माची ऊर्जा विश्वात कायम आहे. तीर्थंकरांचे अनंत पुण्य सर्व पाप समूळ नष्ट करणारे आहे.

- उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

# विनापरवाना जाहिरात फलक लावून पुतळ्याचे विद्रुपीकरण; महापालिकेच्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल

नगर - शहरातील जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात सैनिक लॉन रस्त्यालगत महापालिकेने बसविलेल्या अंतराळवीराच्या पुतळ्याच्या बेसवर विनापरवाना प्रिंटेड पोस्टर लावल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता पोस्टर लावून सार्वजनिक ठिकाणाचे विद्रुपीकरण केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

याप्रकरणी महापालिकेच्या प्रभाग समिती क्रमांक तीनचे प्रभाग अधिकारी शाम तुकाराम गोडळकर यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी महाराष्ट्र मालमत्तेचे विरूपणास प्रतिबंध अधिनियम, १९९५ च्या कलम ३ नुसार गुन्हा नोंदविला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथील रेव्हेन्यू कॅन्टीनसमोर, सैनिक लॉन रस्त्यालगत महापालिकेने अंतराळवीराचा पुतळा बसविला आहे. या पुतळ्याच्या खालील बेसवर प्रिंटेड पोस्टर लावण्यात आल्याचे निदर्शनास आले. या पोस्टरबाबत पडताळणी करण्यात आली. त्यानंतर १९ ऑक्टोबर रोजी घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.

महापालिकेची परवानगी न घेता सार्वजनिक ठिकाणी पोस्टर, फ्लेक्स किंवा बॅनर लावणे हा नियमभंग असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. विनापरवाना फ्लेक्स व बॅनरविरोधात कारवाई करण्याबाबत उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका अन्वये शासनाने स्पष्ट आदेश दिले असल्याचाही उल्लेख फिर्यादीत करण्यात आला आहे. शहरातील सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत जाहिरात साहित्य लावून विद्रुपीकरण केल्याप्रकरणी गुन्हा नोंद केला असून पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.


## महाराष्ट्र शासन
## कार्यकारी अभियंता

**कुकडी वितरण बांधकाम विभाग.कोळवडी ता. कर्जत जि. अहिल्यानगर. पिन कोड -४१४४०२**
**ई मेल पत्ता -kdedkolwadi.engineer83@gmail.com**

### ई-निविदा सूचना क्र. १९ सन २०२६-२७

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता. कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी ता.कर्जत जि. अहिल्यासगर, पिन कोड - ४१४४०२ जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्राणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलाड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता. कुकडी वितरण बांधकाम विभाग. कोळवडी ता.कर्जत जि. अहिल्यानगर, यांनी राखून ठेवला आहे, अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची किंमत रुपये | ठेकेदार पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | पाटबंधारे सिंचन शाखा कर्जत कार्यालयाचे छत गळती, दरवाजा, खिडक्या व आनुषंगिक दुरुस्ती करणे तसेच महिला व पुरुष स्वच्छता गृहाचे बांधकाम करणे. | अहिल्यानगर | ११,०२,३७३/- | सार्वजनिक बांधकाम नोंदणीकृत वर्ग ६ व त्यापुढील |
| २ | सिना उजवा कालवा सा.क्र.कि.मी. २५/१९० मध्ये अतिवाहकाचे दुरुस्तीकरणे | अहिल्यानगर | १५,५०,०००/- | सार्वजनिक बांधकाम नोंदणीकृत अहिल्यानगर जिल्ह्यातील सुशिक्षीत बेरोजगार अभियंते |
| ३ | सिना उजवा कालवा साखळी क्र. ०/००० ते ०/३२० किमी व साखळी क्र. ५१/००० ते ५४/००० किमी येथील कालव्याची अत्यावश्यक दुरुस्ती कामे करणे. | अहिल्यानगर | १२,९१,५१८/- | सार्वजनिक बांधकाम नोंदणीकृत वर्ग ६ व त्यापुढील |

निविदा उपलब्ध कालावधी- दिनांक- २१/१०/२०२६ ते दिनांक २८/१०/२०२६
निविदा उघडण्याचा दिनांक- ३०/१०/२०२६
जा.क्र. कुविबांवि/लेशा-२/४२११/सन २०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी
दिनांक- १४/१०/२०२६

**कार्यकारी अभियंता**
कुकडी वितरण बांधकाम विभाग
कोळवडी ता. कर्जत
जि. अहिल्यानगर

जिमाका/नगर/जाहि/१५७/२०२६


# अहिल्यानगरमध्ये 'माहेश्वरी समाजाचे कुलदेवी दर्शन व रास-दांडिया' उत्साहात

## महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांसह राजस्थानातील ३८ हून अधिक कुलदेवींचे दर्शन; धार्मिक विधी व रास-दांडियाला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



नगर - माहेश्वरी समाजाची धार्मिक आस्था, सामाजिक एकता आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्याच्या उद्देशाने श्री माहेश्वरी युवक मंडळ, अहिल्यानगर आणि माहेश्वरी कनेक्ट, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'माहेश्वरी कुलदेवी दर्शन आणि रास-दांडिया' हा धार्मिक व सांस्कृतिक सोहळा नंदनवन लॉन्स येथे उत्साहात झाला.

या सोहळ्यात महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांतील देवींच्या तसेच राजस्थानातील ३८ हून अधिक माहेश्वरी समाजाच्या कुलदेवींच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. सकाळपासून कुलदेवी दर्शनासाठी समाजबांधवांनी उपस्थिती लावली. विधिवत पूजा-अर्चा, होम-हवन आणि आरती अशा धार्मिक विधींमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

सायंकाळी आयोजित रास-दांडिया कार्यक्रमात समाजबांधवांनी सहभाग नोंदविला. पारंपरिक वेशभूषा, संगीत आणि दांडियाच्या तालावर रंगलेल्या या सोहळ्यामुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले. धार्मिक श्रद्धा आणि सांस्कृतिक परंपरांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला.

माहेश्वरी समाजाच्या विविध कुलदेवींचे एकाच ठिकाणी दर्शन घडवून आणणे, समाजातील बंधुभाव वृद्धिंगत करणे आणि नव्या पिढीला आपल्या धार्मिक व सांस्कृतिक वारशाची ओळख करून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या कार्यक्रमामुळे समाजातील एकात्मता, परस्पर सहकार्य आणि सांस्कृतिक जिव्हाळा अधिक दृढ झाला.

अहिल्यानगर तालुका माहेश्वरी सभेचे विशेष सहकार्य या कार्यक्रमाला मिळाले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कनेक्ट टीममधील योगेश बजाज, निलेश बिहाणी, भूषण मालू, रविकांत काबरा, सोमाणी मनीष, धीरज डागा आणि महेश हेडा यांच्यासह श्री माहेश्वरी युवक मंडळाचे अध्यक्ष अमित खटोड, सचिव पियुष झंवर, उपाध्यक्ष पवन बंग, खजिनदार सीए मनीष नावंदर, सचिव प्रतीक सारडा, ॲड. शाम भुतडा, विशाल झंवर, सुमित चांडक, गोविंदा जाखोटिया, संकेत मानधणे, सीए अनिकेत बलदवा, गोविंद दरक, सुमित बिहाणी, सिद्धार्थ झंवर, संकेत अट्टल, मधुर बिहाणी, इंजि. गोविंदा काकाणी, भूषण काबरा, आदित्य काकाणी, इंटे. अभिनंदन कालाणी, वेदांत बजाज, सीए प्रणव बिहाणी, ऋषिकेश बजाज आणि यश खटोड यांनी परिश्रम घेतले.

सकाळी झालेल्या दुर्गा याग व होम हवन प्रधान आचार्य सोमनाथ मुळे गुरू यांच्या मार्गदर्शनाखाली झाला.

# रिलायन्स इंडस्ट्रीजच्या जिओ आयपीओने रचला इतिहास; सर्वाधिक बोली मिळवणारा ठरला पहिला भारतीय आयपीओ

मुंबई - रिलायन्स इंडस्ट्रीजच्या डिजिटल सेवा शाखा, जिओ प्लॅटफॉर्म्सचा बहुप्रतीक्षित आयपीओ २१ ऑक्टोबर रोजी सबस्क्रिप्शनसाठी खुला झाला आणि अवघ्या काही तासांत बोलीच्या पहिल्याच दिवशी जिओ प्लॅटफॉर्म्सच्या आयपीओला पूर्ण सबस्क्रिप्शन मिळाले.सकाळी १०:३९ वाजेपर्यंत १.०३ पट सबस्क्राईब झाला.ज्यामुळे एवढी मोठी बोली मिळवणारा जिओ पहिला भारतीय आयपीओ ठरला.

२१ ऑक्टोबर रोजी शेअर बाजाराची सुरुवात सकारात्मक झाली आणि सेन्सेक्स, निफ्टीमध्ये तेजी दिसून आली. यातच रिलायन्स इंडस्ट्रीजने अलीकडेच लाँच केलेल्या जिओ प्लॅटफॉर्म्सच्या आयपीओने सबस्क्रिप्शनच्या पहिल्याच दिवशी इतिहास रचला आहे. जिओ प्लॅटफॉर्म्सच्या ३०,२१३ कोटींच्या आयपीओला बोली प्रक्रियेच्या पहिल्या दिवशी २१ ऑक्टोबर रोजी १.१४ पट सबस्क्रिप्शन मिळाले, तर पात्र संस्थात्मक खरेदीदार म्हणजे क्युआयबीएस कडून मिळालेल्या मागणीमुळे या इश्यूला पूर्ण सबस्क्रिप्शनपेक्षा जास्त प्रतिसाद मिळाला.

जिओ प्लॅटफॉर्म्सचा आयपीओ बोली प्रक्रियेसाठी खुला होताच गुंतवणूकदारांनी गर्दी केली आणि बोलीसाठी तुटून पडले. बाजार उघडल्यानंतर अवघ्या ३५ मिनिटांतच संपूर्ण आयपीओ सबस्क्राईब झाला. क्युआयबीएस साठी राखीव भाग दुप्पट अर्ज संख्येसह पूर्णपणे सबस्क्राईब झाला. जिओ प्लॅटफॉर्म्सने आपल्या आयपीओमधील ५० टक्के हिस्सा क्युआयबीएस साठी राखीव ठेवला होता, ज्यामध्ये अँकर गुंतवणूकदारांचा समावेश आहे. क्युआयबीएस साठी राखीव भागाला ३.२५ पट प्रतिसाद मिळाला तर, संपूर्ण आयपीओ एनएसई प्लॅटफॉर्मवर सकाळी १०.३५ पर्यंत सबस्क्राईब झाला. एनएसई आकडेवारीनुसार संपूर्ण आयपीओला १.०१ पट प्रतिसाद मिळाला असून कंपनीने जारी केलेल्या १९७.५ कोटी शेअर्सच्या तुलनेत एकूण २००.३ कोटींची मागणी मिळाली.

त्याचवेळी, १९ ऑक्टोबर रोजी, जिओ प्लॅटफॉर्म्सने २१२ अँकर गुंतवणूकदारांकडून ८,१०९.८४ कोटी उभारले होते. यामध्ये ब्लॅकरॉक, कॅपिटल ग्रुप, फिडेलिटी इन्व्हेस्टमेंट्स, टी. रो प्राइस, श्रोडर्स, जेपी मॉर्गन असेट मॅनेजमेंट, फ्रँकलिन टेम्पलटन, इन्व्हेस्को आणि प्रुडेन्शियल यांचा समावेश होता. जिओ प्लॅटफॉर्म्सच्या आयपीओसाठी अँकर गुंतवणूकदारांची मागणी अंदाजे २.५ लाख कोटींपर्यंत पोहोचली, ज्यामुळे एवढी मोठी बोली मिळवणारा जिओ पहिला भारतीय आयपीओ ठरला.

